# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ७ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# दिल्ली विधानसभेची निवडणूक ५ फेब्रुवारीला आणि निकाल ८ फेब्रुवारीला

## निवडणूक आयुक्तांची घोषणा : ईव्हीएमशी छेडछाड करण्याच्या चर्चेला काही फायदा नाही; ईव्हीएम हॅक करता येत नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ नवी दिल्ली**




नव्या वर्षात दिल्लीत निवडणूक होते आहे. दिल्लीत देशाचं चित्र एकवटलेलं पाहण्यास मिळते. प्रत्येक संस्कृतीचं दर्शन या ठिकाणी होतं. दिल्लीकर यावेळी उत्तम प्रकारे मतदान करतील अशी आशा आहे असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी म्हटलं आहे. दिल्लीमध्ये ७० विधानसभेच्या जागा आहेत. १.५ कोटी हून अधिक उमेदवार दिल्लीत आहेत. २.०८ लाख मतदार असे आहेत जे पहिल्यांदा मतदान करणार आहेत. एका टप्प्यात दिल्लीची निवडणूक होणार आहे. ५ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभेसाठी मतदान होणार तर ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे अशी घोषणा मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केली.

निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद सुरु झाली आहे. या पत्रकार परिषदेत दिल्ली विधानसभा निवडणुकीची आणि निकालाची तारीख जाहीर केली जाईल. ७० सदस्यांच्या दिल्ली विधानसभेचा कार्यकाळ २३ फेब्रुवारीला संपतो आहे. २०२० मध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीची घोषणा ६ जानेवारीला झाली होती. आता आज निवडणूक आयोगाकडून निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी ही तारीख जाहीर केली आहे. तर ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे.




निवडणूक काळात आम्ही बोलू शकत नाही असे सांगत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ईव्हीएम बाबतच्या सर्व आरोप, तक्रारी या खोट्या असल्याचे सांगितले. याचबरोबर दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीची घोषणाही केली आहे.

ईव्हीएमशी छेडछाड करण्याच्या चर्चेला काही फायदा नाही. ईव्हीएम हॅक करता येत नाही, हे न्यायालयाने मान्य केले आहे. मात्र ईव्हीएमवर संशय निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. निवडणुकीच्या सात-आठ दिवस आधी ईव्हीएम तयार असतात. एजंटसमोर ईव्हीएम सील केले जाते. मतदानानंतर ईव्हीएम सील केले जातात. ईव्हीएममध्ये अवैध मतांची शक्यता नाही. ईव्हीएमची प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आहे, असे कुमार म्हणाले.

दिल्लीची ही ईव्हीएम निवडणूक असल्याचे सांगण्यात आले. मतदार यादीतून नावे वगळल्याची तक्रार करण्यात आली आहे. मतमोजणी संथगतीने होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवडणूक आयोगावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रश्नांची उत्तरे देणे ही आपली जबाबदारी आहे. पारदर्शकता ही आमची प्राथमिकता आहे. मतदार यादीत चुकीच्या नोंदी केल्याचे आरोप ऐकून मन दुखावते, असे राजीव कुमार म्हणाले. परंतू, यावर उद्या असू किंवा नाही माहिती नाही, यामुळे आजच यावर उत्तर देणे गरजेचे आहे, असेही कुमार यांनी स्पष्ट केले. आरोप और इल्जामात का दौर चले, कोई गिला नहीं,झूठ के गुब्बारों को बुलंदी मिलें, कोई शिकवा नहीं,हर परिणाम में प्रमाण देते है,पर वो बिना सबूत शक की नई दुनिया रौनक करते हैं और शक का इलाज तो हकीम लुकमान के पास भी नहीं!, अशी शेरोशायरी देखील केली.

सब सवाल अहमियत रखते हैं जवाब तो बनता है आदतन कलमबंद जवाब देते रहे, आज तो रू-ब-रू भी बनता है क्या पता हम कल हो न हो, आज जवाब तो बनता है, असेही त्यांनी म्हटले.

**आप, काँग्रेस आणि भाजपा असा तिरंगी सामना**

खरंतर आप आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष लोकसभा निवडणूक एकत्र लढले होते. मात्र विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्ष वेगळे झाल्याचं दिसून येतं आहे. अजय माकन यांनी अरविंद केजरीवाल यांचा उल्लेख देशद्रोही असा केला होता. त्यानंतर या प्रकरणावरुन दिल्लीचं राजकारण तापलेलं पाहण्यास मिळालं. दुसरीकडे अरविंद केजरीवाल यांच्या शीशमहल या घरावरुन मोदी आणि अमित शाह हे सातत्याने केजरीवालांवर टीका कत आहेत. त्यामुळे या निवडणुकीत काय होणार? हे पाहणं नक्कीच महत्त्वाचं असणार आहे.

# १ एप्रिलपासून सर्व वाहनांसाठी फास्ट टॅग अनिवार्य; राज्य मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

## वाहन चालकांना फास्ट टॅग विंडस्क्रीनवर लावणे अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**




मंत्रालयात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. १ एप्रिल २०२५ पासून राज्यातील सगळ्या वाहनांसाठी फास्टटॅग अनिवार्य करण्यात आला आहे. तसेच शासनाच्या प्रचलित सार्वजनिक खाजगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. यासोबत महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीत सुधारणा करण्याचाही निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे आता ज्या वाहनांवर फास्टटॅग नाही अशांना आता त्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे.

टोल प्लाझावरील गर्दी आणि वाहनांची लांबलचक रांगा टाळण्यासाठी आणि इलेक्ट्रॉनिक टोल संकलन वाढण्यासाठी सरकारकडून फास्ट टॅग ही संकल्पना देशभरात राबवण्यात आली होती. फास्ट टॅग ही इलेक्ट्रॉनिक टोल वसुली प्रणाली असून ती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे चालविली जाते. रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन (आरएफआयडी) तंत्रज्ञानावर फास्ट टॅग काम करते. देशभरात अनेक ठिकाणी याची अंमलबजावणी झाली असून बऱ्यापैकी वाहनचालकांनी फास्ट टॅग लावून घेतले आहेत. मात्र काही वाहनचालकांनी अद्यापही फास्ट टॅग लावलेले नाहीत. त्यामुळे आता महाराष्ट्र सरकारने वाहनांना फास्ट टॅग अनिवार्य केला आहे.

मोदी सरकारने आता सर्व चारचाकी वाहनांसाठी १ जानेवारी २०२१ पासून 'फास्ट टॅग' अनिवार्य केला होता. मात्र त्याची १०० टक्के अंमलबजावणी करण्यात आली नव्हती. त्यामुळे टोल नाक्यांवर कॅश काऊंटरद्वारे टोलची वसुली केली जात होती. फास्ट टॅग नसलेले वाहन चालक पैसे देऊन टोल भरत होते. मात्र आता १ एप्रिल २०२५ पासून फास्ट टॅग अनिवार्य करण्यात आला आहे.

तसेच नियमांनुसार, जर तुमच्याकडे फास्ट टॅग नसेल, तर तुम्हाला टोल टॅक्सच्या दुप्पट रक्कम भरावी लागणार आहे. या नियमाचं आता १ एप्रिलपासून कठोरपणे पालन केलं जाणार आहे. फास्ट टॅग हा वाहनांच्या विंडस्क्रीनवर चिकटवण्याचा नियम आहे. मात्र काहीजण फास्ट टॅग गाडीवर न लावता टोल नाका आल्यास केवळ काचेवर धरत असत. मात्र आता वाहन चालकांना फास्ट टॅग विंडस्क्रीनवर चिकटवा लागणार आहे.

# धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता

## आता करुणा मुंडेही मैदानात, थेट हायकोर्टात धाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि पवनचक्की कंपनीतील खंडणीसंदर्भातील आरोपामुळे अडचणीत आलेले राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय आणखी खोलात जाण्याची शक्यता आहे. कारण धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी आता मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. मुंडे यांनी त्यांच्या पहिल्या पत्नीची मालमत्ता तसेच त्यांच्यावर सुरू असलेल्या विविध खटल्यांची माहिती निवडणूक प्रतिज्ञापत्रात लपवल्याचा दावा करुणा मुंडे यांच्या वकिलांनी केला आहे. याबाबत ४ जानेवारी रोजी कोर्टात याचिका दाखल करण्यात आल्याचे वकिलांनी सांगितले. निवडणूक प्रतिज्ञापत्रात माहिती लपवण्यासह करुणा मुंडे यांचा परळी विधानसभा निवडणुकीतील अर्ज चुकीच्या पद्धतीने बाद करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी दबाव टाकल्याचा आरोपही करुणा मुंडे यांच्या वकिलांनी केला असून याबाबत त्यांनी कोर्टात दाद मागितली आहे. करुणा मुंडे यांच्यामार्फत करण्यात आलेल्या या याचिकेवर पुढील आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, करुणा मुंडे यांच्या तक्रारीनंतर धनंजय मुंडे यांच्याविरोधात विविध ठिकाणी खटले सुरू आहेत. मात्र या खटल्यांची माहिती त्यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात लपवल्याचा आरोप आहे.

# "विधानसभेला झाले ते विसरा, महापालिका निवडणूक तयारीला लागा"; राज ठाकरेंचे मनसैनिकांना आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**




लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिलेल्या मनसेने विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवली. विधानसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी चांगलाच जोर लावला होता. सत्तेत सहभागी होण्याची मनीषा धरत महायुतीसोबत असल्याचे सूतोवाच सातत्याने केले होते. परंतु, विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मनसेला फार मोठा धक्का बसला. मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नाही. मनसेचा एकमेव आमदार असलेले राजू पाटील हेही पराभूत झाले. यानंतर आता मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकसह राज्यातील अनेक महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. मनसैनिकांनी महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेश राज ठाकरे यांनी दिल्याची माहिती देण्यात आली आहे.

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे नेते आणि पदाधिकाऱ्यांची एक बैठक मुंबईत झाली. या बैठकीत राज ठाकरे यांनी विविध गोष्टींचा आढावा घेतला. तसेच विधानसभा निवडणुकीत जे झाले, ते विसरा आणि महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागा, असे आदेश राज ठाकरे यांनी मनसैनिकांना दिल्याची माहिती देण्यात आली आहे. विभाग अध्यक्षांना संघटना बळकट करण्याचे आदेश राज ठाकरे यांनी दिले असून, महापालिका निवडणुकीपूर्वी मनसे नेत्यांची एक टीम आढावा घेणार आहे.

दरम्यान, मनसे नेते संदीप देशपांडे यांनी पत्रकारांशी बोलताना याबाबत काही माहिती दिली. विधानसभा निवडणुका झाल्या. आता महापालिका निवडणुका आहेत. त्याला कशा प्रकारे सामोरे जायचे, यासाठी मुंबईतील विभाग अध्यक्षांची बैठक बोलावली होती. येणाऱ्या काही दिवसांमध्ये पक्ष संघटनात मोठे बदल करण्याच्या दृष्टीने राज ठाकरे यांनी घेतला आहे. तो पूर्ण बदल कशा पद्धतीचा असेल, काही दिवसांत हे येणाऱ्या काही दिवसांत दिसेल, अशी माहिती संदीप देशपांडे यांनी दिली.

# बलात्कार प्रकरणातील दोषी आसाराम बापूला अंतरिम जामीन मंजूर, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७जोधपूर**



एका महिला अनुयायीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूला प्रकृतीच्या कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. ८५ वर्षीय आसाराम बापूला ३१ मार्च पर्यंत अंतरीम जामीन मंजूर झाला आहे, पण या काळात त्यांना आल्या अनुयायांना भेटता येणार नाही, असेही निर्देश देण्यात आलेले आहेत. सध्या त्यांच्यावर जोधपूरच्या आरोग्य मेडीकल सेंटरमध्ये उपचार सुरू आहेत. जोधपूर मध्यवर्ती कारागृहात ते जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत.

आसाराम बापूला हृदयाशी संबंधित आजार आहे. याआधी त्यांना हृदयविकाराचा झटका येऊन गेला होता. अंतरिम जामीन देत असताना पुरेशी सुरक्षा व्यवस्था पुरविण्याचेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. जेणेकरून त्यांच्यावर देखरेख ठेवता येईल.१८ डिसेंबर रोजीच सर्वोच्च न्यायालयाने आसाराम बापूला १८ दिवसांचा पॅरोल दिला होता. १ जानेवारी रोजी जोधपूर कारागृहात परतल्यानंतर आता पुन्हा एकदा अंतरिम जामीन देण्यात आला आहे. मागच्या वर्षी ऑगस्ट महिन्यात वैद्यकीय उपचारांसाठी राजस्थान उच्च न्यायालयाने त्याला सात दिवसांचा पॅरोल दिला होता.

# काँग्रेसच्या दिल्लीतील भूमिकेला शिवसेनेचा विरोध : केजरीवाल यांच्या पक्षाला देशद्रोही ठरवणे, कोणालाही मान्य होणार नाही : संजय राऊत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष आणि केजरीवाल यांचा पक्ष एकत्र आले होते. दोन्ही पक्षाचे नेते एकमेकांच्या व्यासपीठावर गेले. मात्र तरी देखील दिल्लीमध्ये काँग्रेस पक्ष अरविंद केजरीवाल यांना दहशतवादी ठरवण्याचा प्रयत्न करत आहे. त्याला शिवसेनेचा पाठिंबा नसल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. अरविंद केजरीवाल यांच्या पक्षाला देशद्रोही ठरवणे हे कोणालाही मान्य होणार नाही, असा दावा देखील राऊत यांनी केला आहे.



दिल्ली विधानसभा निवडणुकीची आज घोषणा होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी काँग्रेस पक्षावर निशाणा साधला. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आणि आम आदमी पक्ष एकत्र लढले असले तरी दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडी स्थापन झालेले नाही. हे दोन्ही पक्ष एकत्र लढण्याची शक्यता होती. मात्र, हे दोन्ही पक्ष स्वबळावर लढत आहे.

लोकसभा निवडणुकीत सर्व पक्षांनी एकत्र येऊन भारतीय जनता पक्षाला आम्ही मागे लोटले होते. इंडिया आघाडीने एनडीएचा पराभव केला आहे. केवळ चंद्राबाबू आणि नितिश कुमार यांच्या कुबड्यावर मोदींचे सरकार स्थापन झाला असल्याचा दावा देखील खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मात्र, दुर्दैवाने दिल्ली विधानसभा निवडणुकीत तसे चित्र सध्या दिसत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. भारतीय जनता पक्षाचा पराभव करण्यासाठी आपापसातील मतभेद विसरून एकत्र येणे गरजेचे होते, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

## संपादकीय ......

# एकनाथ शिंदे पुन्हा 'उभारी' घेणार

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या आणि निवडणूक निकालानंतर राज्याचे मुख्यमंत्रीपद भाजपाकडे आणि त्यातही शिंदे सरकारमधील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जाणार हे स्पष्ट झाल्यानंतर त्याचा सर्वाधिक मानसिक परिणाम हा एकनाथ शिंदे यांच्यावर झाला. भाजपाला महाराष्ट्रात रेकॉर्ड ब्रेक १३२ अधिक पाच अपक्ष १३७ आमदारांचे प्रथमच भरगच्च असे पाठबळ मिळाले, तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ५७ आमदारांचे बळ प्राप्त झाले. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला ४१ आमदार विधानसभेवर निवडून आणता आले. उबाठा २०, काँग्रेस १५, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला अवघ्या दहा जागांवर यश मिळवता आले. या निकालाने महाराष्ट्रातील भाजपा विरोधी महाआघाडीचा सुपडा पूर्णपणे साफ करून टाकला. महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला तर भरभरून यश दिलेच मात्र त्याचबरोबर भारतीय जनता पक्ष हा स्वबळावर महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष म्हणून या निवडणुकीत उभारून आला. भाजपाच्या या प्रचंड यशाचे परिणाम ज्याप्रमाणे विरोधी पक्षांवर होत आहेत त्याचबरोबर काही प्रमाणात महायुतीतील घटक पक्षांवर देखील भाजपाच्या या प्रचंड यशाचा परिणाम झालेला दिसत आहे. त्यातही प्रामुख्याने उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्यावर बदललेल्या राजकीय परिस्थितीचा परिणाम जाणवताना स्पष्टपणे दिसत आहे. बदललेल्या राजकीय परिस्थितीमधून स्वतःला सावरून शिवसेनेला पुन्हा उभारी देण्याचे एक मोठे आव्हान एकनाथ शिंदे यांच्यासमोर उभे आहे. याचे सर्वात प्रमुख कारण आहे ते म्हणजे राज्यात आगामी काळात होऊ घातलेल्या महापालिका नगर परिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या निवडणुका हे आहे.

२०१९ पूर्वीची महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती आणि २०१९ नंतर व त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत उठाव केल्यानंतरची राजकीय स्थिती यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतरची राजकीय परिस्थिती आणि आता महाराष्ट्रात दोन महिन्यांपूर्वी झालेल्या राजकीय सत्ता सारीपटावरील स्थित्यंतरानंतरची परिस्थिती यातही खूप मोठा फरक पडला आहे. देवेंद्र फडणवीस यांचे उपमुख्यमंत्री पदावरून पुन्हा तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होणे हे जसे मोठे धक्कादायक होते त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपमुख्यमंत्री होणे हे देखील त्यांच्यासाठी अवघड स्थितीतले होते. या अवघडलेल्या स्थितीतून एकनाथ शिंदे हे अद्यापही पूर्णपणे सावरल्याचे दिसून येत नाही. ते सावरण्याचा प्रयत्न जरूर करत आहेत तथापि त्यांची काम करण्याची जी एक पद्धत आहे या कार्यपद्धतीला काहीसा ब्रेक या राजकीय व्यवस्थेमध्ये लागल्याचे दिसते. मुख्यमंत्र्यांप्रमाणे अमर्याद अधिकार आता उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे नाहीत. त्याचबरोबर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उबाठामध्ये ज्या भेटीगाठी होत आहेत त्या देखील एकनाथ शिंदे यांच्यासाठी अनुकूल नाहीत. या सरकारमधील दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यामुळे देखील एकनाथ शिंदे यांची सरकारमध्ये काहीशी कोंडी झाल्यासारखी स्थिती आहे. या सर्व परिस्थितीवर मात करून एकनाथ शिंदे यांना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात स्वतःला आणि त्याचबरोबर शिवसेनेला उभारी आणण्यासाठी कंबर कसून जोमाने उभे राहावे लागणार आहे. भाजपाचा नारा हा देखील एकनाथ शिंदे यांच्यासाठी आगामी काळात आव्हानात्मक असणार आहे. एकनाथ शिंदे यांचा आगामी काळात पहिलाच मोठा आणि जंगी सामना हा उद्धव ठाकरे यांच्याबरोबर मुंबई महापालिका निवडणुकीतच होणार आहे.

मुंबई महापालिका हा उद्धव ठाकरे यांचा श्वास आहे. त्यामुळे भाजपाच्या मदतीने मुंबई महापालिका जिंकणे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. मुंबई महापालिका जर एकनाथ शिंदे हे जिंकून देऊ शकले तरच राज्यातील आणि केंद्रातील सत्तेत त्यांचे स्थान अधिक भक्कम आणि बळकट होऊ शकते. यासाठी एकनाथ शिंदे यांना सर्वात आधी म्हणजे स्वतःमधील नैराश्य हे पूर्णपणे झटकून पुन्हा नव्या उमेदीने सामान्य जनतेसाठी आणि कार्यकर्त्यांसाठी उभे राहावे लागणार आहे. अर्थात हे करत असताना स्वतःच्या भोवती सतत कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची आणि त्याचबरोबर सर्वसामान्यांची प्रचंड गर्दी म्हणजेच सर्वात लोकप्रिय आणि यशस्वी नेता असणे या गोड गैरसमजातून त्यांना लवकरात लवकर बाहेर पडावे लागणार आहे. त्याचप्रमाणे सत्तेतील नेमके संधी साधू कोण आहेत याचा शोध जर का एकनाथ शिंदे हे घेऊ शकले, तर त्यांच्या हाती जे सत्य लागेल ते पचवणे हे त्यांनाही अत्यंत अवघड होऊन बसेल. मात्र या कटू सत्याचा शोध घेण्याचे धाडस हे देखील कधीतरी शिवसेनेसारख्या आक्रमक पक्षाचा मुख्य नेता म्हणून एकनाथ शिंदे यांना करावेच लागणार आहे आणि जर का ते आत्ता करू शकले नाहीत, तर झपाट्याने बदलत असलेल्या राजकीय स्थितीत ही संधी देखील त्यांच्या हातातून गेलेली असेल.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आगामी काळात होऊ घातलेल्या मुंबई महापालिका, ठाणे महापालिका, कल्याण-डोंबिवली महापालिका तसेच राज्यातील अन्य महापालिका जिल्हा परिषदा पंचायत समित्या अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या त्या-त्या जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांसाठी सर्वसामान्य शिवसैनिकांसाठीही ज्यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांचा हात पकडला आहे. अशा शिंदे समर्थकांसाठी अनन्यसाधारण महत्त्वाच्या आहेत. लोकसभेत खासदारांचे बळ वाढण्यासाठी आणि विधानसभेत अधिकारी आमदार निवडून येण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते पदाधिकारी आणि त्याचबरोबर महापालिका जिल्हा परिषद पंचायत समिती यांच्यामधील सत्ता ही राज्याच्या आणि देशाच्या राजकारणात मोठी भूमिका बजावत असते. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी राज्यात महापालिका आणि जिल्हा परिषदा या अस्तित्वात नव्हत्या. मात्र तरी देखील भाजपा शिवसेना आणि राष्ट्रवादी यांना विधानसभा निवडणुकीत दणदणीत यश मिळाले याचे प्रमुख कारण म्हणजे महायुतीची सत्ता ही राज्यात होती आणि मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी स्थानिक नेतृत्वाला बळकट करण्याबरोबरच त्याला त्या मतदारसंघात पुन्हा नव्याने निवडून येण्यासाठी जे काही पाठबळ द्यावे लागते ते पूर्ण ताकतीनिशी एकनाथ शिंदे यांनी पाठीशी उभे करून दिले होते. २०१४ पासून भाजपाची केंद्रात आणि राज्यात सत्ता असल्यामुळे भाजपाचा संघटना विस्तार हा स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर फोफावलेला आहे. त्याचाच मोठा फायदा भाजपाला या विधानसभा निवडणुकीत झाला. हे जर लक्षात घेतले, तर आगामी महापालिका जिल्हा परिषद आणि पंचायत समिती जिंकण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पुन्हा नव्याने शिवसेनेला विजयी करण्यासाठी कंबर कसावी लागणार आहे.


# नवा व्हायरस, घाबरू नका; सतर्क राहा!

## राज्यातील जिल्हा रुग्णालये सतर्क

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती-** चीनमध्ये मेटाप्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) या श्वसनासंबंधी आजाराचा उद्रेक झाला आहे. यामुळे राज्यातील आरोग्य विभागाकडून सर्व जिल्हा रुग्णालयांना यासंबंधी सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भविष्यातील धोका ओळखून सतर्क राहण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. नागपूरमध्ये सध्या २ संशयित रुग्ण आढळून आले आहेत.

मेटाप्युमोव्हायरस यापूर्वी २००१ मध्ये आढळून आला आहे. त्यामुळे हा आजार नवा नसून, जुना असल्याचे बोलले जात आहे. परंतु, सध्या बंगळुरूमधील आठ महिन्यांच्या बालकाला मानवी मेटाप्युमोव्हायरसची लागण झाल्याचा संशय पीटीआयने दिले आहे. त्यामुळे सावधगिरी बाळगण्याचे आवाहन आरोग्यसेवा महासंचालक डॉ. अतुल गोयल यांनी निवेदनाद्वारे केले आहे. ते म्हणाले की, चीनमध्ये आढळलेला विषाणू हा श्वसनाच्या विषाणूसारखा आहे. ज्यामुळे सामान्यपणे सर्दी होते. यामुळे वृद्ध आणि अगदी लहान मुलांमध्ये फ्लूसारखी लक्षणे दिसू शकतात. त्यांनी लोकांना श्वासोच्छ्वासाच्या आजारांच्या बाबतीत सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. लोकांना घाबरण्याची गरज नाही. आरोग्य मंत्रालय देशभरातील श्वसन संसर्गांच्या पसरण्यावर आणि ऋतुबद्ध




इन्फ्लूएंझा ट्रेंड्सवर सक्रियपणे लक्ष ठेवत आहे. देशातील कोणत्याही संस्थेकडून मोठ्या प्रमाणात प्रकरणे नोंदवली गेली नाहीत, असे सरकारी सूत्रांनी म्हटले आहे.

**एचएमपीव्ही काय आहे?**

-एचएमपीव्ही एक श्वसनासंबंधी व्हायरस आहे.-जो मुख्यत: श्वसन मार्गावर परिणाम करतो.-या व्हायरसला मेटाप्युमोव्हायरस किंवा एचएमपीव्ही असे म्हटले जाते.-सर्दी, खोकला, नाक वाहणे किंवा घसा खवखवणे यांसारखी लक्षणे दिसून येतात.-एचएमपीव्ही संसर्ग लहान मुले आणि वृद्धांमध्ये गंभीर असू शकतो.

-या व्हायरसमुळे रोगप्रतिकारकशक्ती कमकुवत होण्याची शक्यता असते.

**या गोष्टी करा**

-साबणाने वारंवार हात धुवा. सतत खोकला येत असेल तर तोंडाला रुमाल लावा.

-ताप, सर्दी झाली असेल तर गर्दीमध्ये जाऊ नका.

-संतुलित आहार घ्या.


-दिवसभर भरपूर पाणी प्या.




# दररोज ब्लॅक कॉफी प्यायल्याने मिळतात गुणकारक फायदे

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

संपूर्ण जगामध्ये ब्लॅक कॉफी एक लोकप्रिय पेय आहे. अनेकांना सकाळची सुरुवात ब्लॅक कॉफीने करायला आवडते. निरोगी आरोग्याच्या दृष्टीकोनातून अनेक जण चहाच्या ऐवजी कॉफी पितात.ब्लॅक कॉफी पिण्याचे आरोग्याला अनेक फायदे आहेत. ब्लॅक कॉफीमध्ये कॅलरीजचे प्रमाण कमी असते. कॉफीमध्ये कॅफीन असते हे चयापचय वाढवून चरबी कमी करण्यासाठी मदत करते. तसेच वजन कमी करण्यासाठी, मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी तसेच हृदयाच्या आरोग्यासाठी देखील ब्लॅक कॉफी फायदेशीर आहे. पण महत्वाची गोष्ट म्हणजे ब्लॅक कॉफी साखरेशिवाय प्यायला हवी अन्यथा याचा अधिक फायदा होणार नाही. पण तुम्हाला माहीत आहे का ब्लॅक कॉफी पिण्याचे फायदे कोणते चला तर जाणून घेऊया.



### मानसिक आरोग्य सुधारते

ब्लॅक कॉफामध्ये कॅफीन असते जे मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत करते. याशिवाय हे तणाव आणि चिंता कमी करण्यासाठी देखील मदत करते. ज्यामुळे मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते. त्यामुले चहाऐवजी तुम्ही ब्लॅक कॉफीचे सवन करु शकता.

### हृदयासाठी फायदेशीर

ब्लॅक कॉफीमध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडेंट असतात. जे हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात. तसेच हे ब्लड प्रेशर नियंत्रित करण्यासाठी मदत करतात. माहितीनुसार, रोज एक ते दोन कप ब्लॅक कॉफी प्यायल्याने हृदयाशी संबधित आजारांचा धोका कमी होतो.

### वजन कमी करण्यास मदत

जर तुम्हाला वजन कमी करायचे असल्यास तुम्ही ब्लॅक कॉफीचे सेवन करु शकता. यामध्ये कॅफिन असते जे वजन कमी करण्यास मदत करते. हे चयापचय वाढविण्यात देखील मदत करते. तुम्ही काही खाल्ल्यानंतर लगेच ब्लॅक कॉफी घेऊ शकता. हे तुमचे वजन वाढण्यापासून रोखते. ब्लॅक कॉफी पिऊन तुम्ही तुमचे वजन नियंत्रित करू शकता.

### पचनक्रिया सुधारते

कॉफी पचनासाठी चांगली मानली जाते. ब्लॅक कॉफीचे सेवन केल्याने शरीरातील टॉक्सिन आणि बॅक्टेरिया निघून जातात. याशिवाय अपचन, गॅस आणि बद्धकोष्ठते सारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**टीप :** वरील माहिती आम्ही फक्त वाचक-प्रेक्षकांपर्यंत पोहचवत आहोत. याचं समर्थन अथवा दावा करत नाही. त्यामुळे कोणतेही उपचार, डाएट आणि औषधं तज्ज्ञांच्या सल्ल्यानं घ्यावीत.

# युरोपियन बाजारपेठेत संत्रा निर्यातीसाठी कसे हवे फळ? काय कराल उपाययोजना

कृषी विशेष

**दि.७ विदर्भ प्रजासत्ताक**

भारतातून संत्र्याची निर्यात फार नगण्य होते. नागपूर संत्रा किंवा त्यासारखे लवकर साल निघणाऱ्या फळांची निर्यात कमी आहे व त्याची कारणे अनेक आहेत.

उदाहरणार्थ नागपुरी संत्र्याची चव व स्वाद, आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रियता न मिळणे, संत्रा पिकाचे कमी उत्पादन, उत्पादनाचा व वाहतुकीचा जादा खर्च फळांचा निर्यातयोग्य दर्जा, योग्य पॅकिंग व इतर निर्यातयोग्य बाबींची अपुरी माहिती, अति जलद वाहतूक उपलब्ध न होणे इ.

जगातील संत्रा निर्यातदार देशांमध्ये भारताचा वाटा केवळ ०.१ टक्के इतकाच आहे. स्पेन या देशाचे संत्रा उत्पादन हे भारतातील संत्रा उत्पादनाइतकेच असले तरी त्यांचा संत्रा निर्यातीमधील वाटा ३८.१ टक्के इतका आहे.महाराष्ट्रामध्ये संत्र्याचे उत्पादन जरी मोठ्या प्रमाणावर घेण्यात येत असले तरी, नागपूर संत्रा वाणाच्या फळांना निर्यातक्षम गुणवत्ता नसल्यामुळे महाराष्ट्रातून संत्र्याची निर्यात केली जात नाही. भारतातून प्रामुख्याने संकरित जातीच्या संत्र्याची निर्यात केली जाते.

संत्र्याची आयात करणाऱ्या देशांमध्ये बांग्लादेश, मॉरिशियस, श्रीलंका, चीन, हाँगकाँग, सिंगापूर, जपान, मलेशिया व सौदी अरेबिया हे देश भारताच्या शेजारील देश असल्यामुळे सदर देशांना भारतातून संत्र्याची निर्यात करणे किफायतशीर होऊ शकते.

सद्यस्थितीत इंग्लंड, अरब व दक्षिण-पूर्व आशियाई इ. देशांमध्येसुद्धा संत्र्याची भारतामधून काही प्रमाणात निर्यात करण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला आणि संत्रा बागायतदार संघ यांच्या संयुक्त माध्यमाने नागपूर संत्र्याला भौगोलिक निर्देशांक प्राप्त झालेला आहे.

त्या भौगोलिक निर्देशांकाचा, संत्रा बागायतदारांनी निर्यातीसाठी उपयोग केल्यास आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये नागपूर संत्र्याला चांगला भाव मिळण्यासाठी सहाय्य होऊ शकते.

युरोपियन बाजारपेठेत संत्र्याच्या निर्यातीची मानके

१) रसाचे प्रमाण : कमीत कमी ३३ ते ४० टक्के.

२) फळांचा रंग : फळांच्या १/३ ते २/३ भाग पिवळट नारंगी किंवा पूर्ण भाग नारंगी असणे आवश्यक आहे.

३) फळांचा व्यास : ५० ते ५५ मिलिमीटर व्यास. कमीत कमी ४५ मिलिमीटर.

४) फळातील बिया : बिया नसलेल्या फळांना प्राधान्य.

५) फळांचा आकार : गोल, मान किंवा चोच नसलेले.

६) फळांची साल : चोपड्या सालीचे फळे.

७) एकूण विद्राव्य घटक : १० ते १२ टक्के.




संत्रा निर्यातीसाठी उपाययोजना

१) नागपुरी संत्रा व्यतिरिक्त निर्यात योग्य उत्पादन देणाऱ्या इतर जातींची लागवड करणे.

२) संत्रा उत्पादनाच्या बाबतीत त्या त्या परिसरामध्ये सहकारी संस्थांची स्थापना करणे आणि सदर सहकारी संस्थांची एक शिखर संस्था तयार करणे, जेणेकरून व्यापाऱ्यांच्या मक्तेदारीला आळा बसेल.

३) संत्रा उत्पादनाच्या परिसरामध्ये ग्रेडिंग, पॅकिंग हाऊसची तसेच शीतगृह सुविधेची उभारणी करणे.

४) संत्रा उत्पादकांना निर्यातयोग्य संत्रा उत्पादनाचे, काढणी आणि हाताळणी याबाबतचे मार्गदर्शन करण्याचे कामी संबंधित परिसरामध्ये तज्ञांची नियुक्ती करणे.

५) अपेडा, नवी दिल्ली यांचेकडून ज्याप्रमाणे आंब्याच्या समुद्रमार्ग निर्यातीसाठी सहकार्य केले जाते, त्याचप्रमाणे संत्र्याच्या समुद्रमार्गे निर्यातीसाठीही मदत घेऊन संत्र्याची निर्यात करणे. त्याचबरोबर संत्रा निर्यातीसाठी अर्थसहाय्य प्राप्त करून घेणे.

६) संत्रा निर्यातीच्या उपक्रमांमध्ये त्या त्या परिसरातील सक्षम कृषी उत्पन्न बाजार समित्यांना सामावून घेणे.

७) संत्रा निर्यातीसाठी राज्य शासनाकडून अर्थसहाय्य प्राप्त करून घेणे.

८) केंद्र शासनाने संत्रा निर्यातीकरिता आणि प्रक्रियेकरिता महाराष्ट्रामध्ये अमरावती आणि नागपूर हे जिल्हे निर्यात क्षेत्र म्हणून जाहीर केलेले असल्यामुळे कृषी पणन मंडळामार्फत संत्रा निर्यातीचा उपक्रम हाती घेणे.

९) भारतामध्ये पंजाब राज्यात किंनो या जातीच्या संत्र्याची लागवड यशस्वी झालेली असून या संत्र्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत देखील मागणी आहे. महाराष्ट्रामध्ये देखील या किंवा अशा जातींच्या लागवडीचा प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत इंग्लंड, अरब व दक्षिण-पूर्व आशियाई इ. देशांमध्येसुद्धा संत्र्याची भारतामधून काही प्रमाणात निर्यात करण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला आणि संत्रा बागायतदार संघ यांच्या संयुक्त माध्यमाने नागपूर संत्र्याला भौगोलिक निर्देशांक प्राप्त झालेला आहे.

# गव्हाच्या चपातीपेक्षा बाजरीची भाकरी झाली महाग

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक-** हिवाळ्यातील उष्णतावर्धक धान्य म्हणून बाजरीची भाकरी खाण्याकडे आरोग्य जपणाऱ्यांचा कल वाढला आहे. वाढलेल्या मागणीनुसार बाजारात पुरवठा होत नसल्याने बाजरीचे दर वधारले आहेत. परिणामी गव्हाच्या चपातीपेक्षा बाजरीची भाकरी महागात पडत आहे.

शेतकरी बाजरी पिकाला महत्त्व देत नाहीत. यामुळे बाजरी आणि ज्वारीचे दर( चार ते साडेचार हजारांवर पोहोचले, तर गव्हाचे दरही चांगलेच वधारले आहेत. तरीही चपातीपेक्षा बाजरीची भाकरी महाग असल्याचे चित्र आहे. हिवाळा सुरू झाल्यानंतर नागरिक उष्णतावर्धक खाद्यपदार्थांना प्राधान्य देतात.

वाढलेली थंडी पाहता सुकामेवा, बाजरीची भाकरी अशा खाद्यपदार्थांचे सेवन केले जाते. त्यामुळे घरोघरी असो की हॉटेल, ढाबा अशा सर्व ठिकाणी बाजरीची भाकरी बनवली जाते. मागणी वाढल्याने व बाजरीचे दर वाढल्याने बाजरीची भाकर महाग झाली आहे.

दोन महिन्यांत गव्हाचे दर मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मध्यम दर्जाचा गहू लोकवण, शरबती ३६ ते ४० रुपयांवर पोहोचला आहे. तर बाजरीचे दर ४० ते ६५ रुपये प्रतिकिलो आहेत. बाजरी ही उष्ण असल्याने ती थंडीत आवर्जून खाल्ली जाते.

### बाजरीच्या भाकरीला मागणी वाढली

जेवणात एक वेळ बाजरीच्या भाकरीचा सामावेश होऊ लागला आहे. यामुळे मागणी वाढली आहे. बाजरीचे सेवन केल्याने शरीरातील अंतर्गत उष्णता टिकवून ठेवण्यासाठी खूप फायदेशीर आहे. ज्वारी आणि बाजरी मधुमेहाच्या रुग्णांसाठी व रक्तातील साखर कमी करण्यासाठी रामबाण समजली जाते. असे आहार तज्ज्ञांकडून सांगण्यात येते. बाजरीत मोठ्या प्रमाणात फायबर असल्याने योग्य पचन राखण्यास मदत होते. त्यामुळे हिवाळ्यात बाजरीची भाकर खाण्यास प्राधान्य दिले जाते.

### कसे आहेत गहू, बाजरीचे बाजारभाव

आज सर्वसाधारण बाजरीला अहिल्यानगर बाजारात २८०० रुपये, तर अमरावती बाजारात २८५० रुपये सरासरी दर मिळाला. नांदगाव बाजारात ८२०३ या बाजरीला २३५० रुपये, तर जालना बाजारात हिरव्या बाजरीला २८०० रुपये, तर अकोला बाजारात १९५० रुपये दर मिळाला. पुणे बाजारात महिको बाजरीला सर्वाधिक ३७५० रुपये दर मिळाला.




तर आज सर्वसाधारण गव्हाला अहिल्यानगर बाजारात २७०० रुपये तर कळम करमाळा बाजारात २५ रुपये दर मिळाला. तर २१८९ गव्हाला लासलगाव बाजारात ३२७५ रुपये, वाशिम बाजारात २७०० रुपये तर भंडारा बाजारात २७०० रुपये दर मिळाला. बन्सी गव्हाला मुरूम बाजारात ३४०० रुपये तर सोलापूर बाजारात शरबती गावाला ३७०० रुपये, पुणे बाजारात ४५०० रुपये, तर नागपूर बाजारात ३३५० रुपये दर मिळाला.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ७ जानेवारी २०२५

शहर/ग्रामिण


# एचएमपीव्हीची महाराष्ट्रात एन्ट्री

## नागपूरमध्ये २ रूग्ण आढळले, सरकार अलर्ट मोडवर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७नागपूर** – चीनमधील एचएमपीव्ही व्हायरसच्या बातमीने प्रत्येकाच्या काळजात धडकी भरली. सोमवारी महाराष्ट्राच्या वेशीवर येऊन धडकलेला एचएमपीव्ही विषाणूने महाराष्ट्रात एन्ट्री केली आहे. चीनमध्ये उदय झालेल्या एचएमपीव्ही विषाणूमुळे काही देशातील आरोग्य व्यवस्था ढासळली आहे. भारतातही या विषाणूने एन्ट्री केली आहे. भारतात आतापर्यंत ८ ते १० रूग्ण आढळले आहेत. नागपूरमध्ये एचएमपीव्ही या विषाणूचे दोन संशयीत रूग्ण आढळले आहे. राज्य सरकार अलर्ट मोडवर आहे.

नागपुरातही एचएमपीव्ही चे २ रुग्ण संशयित आढळले आहेत. दोन लहान मुलांचा रिपोर्ट एचएमपीव्ही पॉझिटिव्ह आल्याच खासगी रुग्णलायांतून सांगितलं जातं आहे. यामध्ये सात वर्षीय मुलगा आणि १४ वर्षीय मुलीचा रिपोर्ट ३ जानेवारीला खासगी रुग्णालयात पॉझिटिव्ह आल्याचे समोर आलेय. मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुलं सध्या ठणठणीत बरी झालेली आहेत. पण जीनोम सिक्वेन्सींग केली जाईल, असे समोर आलेय.

या दोन्ही मुलांना खोकला आणि ताप होता.



दोन्ही मुलांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची गरज पडली नाही. दोन्ही रुग्ण आजारातून बरे झाल्याचीही माहिती. खाजगी रुग्णालयातून हे रिपोर्ट घेण्यात आले आहेत, त्यामुळे या सगळ्या संदर्भात शासकीय लॅबमधून याची जीनोम सिक्वेन्सींग केली जाईल. त्यानंतरच हे रुग्ण एचएमपीव्ही असल्याचं स्पष्ट होईल, असे सांगण्यात येत आहे.

कोरोनासारखीच परिस्थिती एचएमपीव्हीच्या बाबतीत ओढवू नये. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाला विविध निर्देश देण्याची मागणी या अर्जाद्वारे न्यायालयात करण्यात आली आहे. ज्यामध्ये आजारावर सूक्ष्म नजर ठेवण्यात यावी. एचएमपीव्ही चाचण्या वाढविण्यात याव्या, नियमित जनजागृती अभियान राबवावे.

### कपोलकल्पित माहितीवर विश्वास ठेवू नका – मुख्यमंत्री



एचएमपीव्ही या व्हायरसला घाबरण्याचं कारण नाही. प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाही, यापूर्वीही हा व्हायरस आला आहे. पुन्हा एकदा या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी नियमावली आहे ती जाहीर होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राज्यांना माहिती देण्याचं ठरवलं आहे. या व्हायरसला घाबरुन जाण्याची आवशयकता नाही. या संदर्भातल कपोलकल्पित माहिती देऊ नका. जी अधिकृत माहिती येईल ती माहितीच द्यावी.अश्या सुचनाआरोग्य विभागाला देण्यात आल्या आहेत.

### नागपूर कोर्टात याचिका ? कोरोना सारखी स्थिती होऊ नये, म्हणून याचिका

'एचएमपीव्ही' आजारापासून नागरिकांचा बचाव करण्यासाठी उपाय योजना काय? असे म्हणत मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठात एडवोकेट श्रीरंग भांडारकर यांनी अर्ज दाखल केला आहे. राज्याची आरोग्य यंत्रणा कोरोनाच्या वेळी सज्ज नव्हती, परिणामी सर्वत्र हाहाकार माजला होता, हजारो नागरिकांचा करुणामुळे मृत्यू झाला होता, असेही त्यात म्हटलेय.

# दिर्घआयुष्य जगण्यासाठी संगीत हे सर्वात मोठे औषध – आ.रवी राणा

## ४०० तासांच्या वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रमास दमदार सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती**

अमरावतीत प्रथमंच अठरा दिवस व १८ रात्र असा ४०० तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रमाला सुरूवात झालेली आहे.

सर्वप्रथम सरस्वती मातेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर स्वराज्य एंटरटेनमेंटचे स्वामिनी यांची मुलगी स्वराध्या हिने बुद्धि दे तू तेज दे नव चेतना विश्वास दे हे गाणे गाऊन कार्यक्रमाला सुरुवात केली. यानंतर स्वराज संचालक दिनकर जाडे यांनी जय हनुमान ज्ञान गुण सागर हा हनुमान चालीसा गाऊन कार्यक्रमाला चांगलीच रंगत आणली.

प्रास्ताविक स्वराध्य इंटरटेनमेंटच्या संचालिका स्वामिनी दिनकर तायडे यांनी केले. स्वराज्या एंटरटेनमेंटची सुरुवात अमरावतीला २०१७ पासून झाली. त्यानंतर नवोदित कलाकारांना सोबत घेऊन त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी प्रास्ताविकात सांगितले. कार्यक्रमाचे उद्घाटक रवी राणा यांनी सांगितले की, वल्डरकॉर्डची संकल्पना नागपूरहून अमरावतीला आणणारे मनीष पाटील, स्वराज्य संचालक दिनकर ताळे व स्वामिनी तायडे यांनी १८ दिवस वर्ल्ड रेकॉर्डचा कार्यक्रम अमरावतीला घेऊन खूप मोठे धाडस केले. अमरावतीमध्ये हा कार्यक्रम पहिल्यांदाच होत आहे.

संगीत हे असे आहे कीमाणसाला कितीही मोठे टेंशन असले तरी आपण संगीतात रमलो असताना आपल्यावर आलेले टेन्शन आपणास अजिबात माहिती पडू देत नाही. संगीतामुळे आपला तणाव नाहीसा होतो. तणावांमध्ये आपण स्वतः संगीतात रमून गाणे म्हणत राहिले म्हणजे कोणतेही टेन्शन आपल्याला येणार नाही. मनीष पाटील तसेचचंद्रकांत भाऊ यांच्यासारख्या लोकांनी अमरावती येथील कलाकारांना एक मंच उपस्थित करून कराओकेच्या माध्यमातून शहरात वीस ते २२ स्टुडिओ स्थापन करण्यात आले आहे. यामध्ये ४०१ तासाची वर्ल्ड रेकॉर्ड संकल्पना यासोबत जोडून कलाकार लोकांचा उत्साह द्विगुणित केला. सर्व लोक तनावमुक्त झाले पाहिजे, याकरिता अमरावतीमध्ये सांस्कृतिक भवनसारखा स्टुडिओ आपल्या अमरावतीमध्ये झाला पाहिजे. त्याकरता सरकारी निधी कसा मिळेल,

त्यासाठी आमचा पुरेपूर प्रयत्न राहील, आम्ही महानगरपालिका यांना सुद्धा स्टुडिओ स्थापन करण्याकरीता आवाहन करू, असे रवी राणा म्हणाले.मनीष पाटील यांच्यासह कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी विचार व्यक्त केले. प्रास्ताविक स्वामिनी दिनकर जायले यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक डॉ. ईशांत राजगुरे यांनी केले. हा वर्ल्ड रेकॉर्ड कार्यक्रम २१ जानेवारीला दुपारी तीन वाजता समाप्त होईल.

# जिल्हा तंत्र प्रदर्शनीत १६२ मॉडेलचे विद्यार्थ्यांकडून दमदार सादरीकरण

## एमसिव्हीसी विभाग बंद पडू देणार नाही :खा.बळवंत वानखडे








**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती** – ज्या विभागात मी काम केलं, त्या विभागाच्या तंत्र प्रदर्शनीचे उद्घाटन करण्याचा मला आनंद झाला आहे.

एमसीव्हीसी विभाग निर्माण झाला तेव्हापासूनच बंद होणार, असे सांगण्यात आले. मात्र तो आजही कायम आहे. यापुढेही सुरूच राहणार, हा विभाग बंद पडू देणार नाही, असे सांगत या विभागाबाबत केवळ सरकारच नव्हे तर संस्था चालकांमध्येही उदासीनता दिसून येत असल्याची खंत खासदार बळवंत वानखडे यांनी व्यक्त केली. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, संत गाडगे महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा तंत्र प्रदर्शनी– २०२५ चे उद्घाटन संत गाडगे महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नवाथेनगर येथे पार पडले. त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कौशल्याला चालना देण्याकरिता ही तंत्र प्रदर्शनी आहे. काही विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य उपजत असतं, स्वतः मधील कौशल्य विकसित करण्यासाठी त्यांना या माध्यमातून संधी मिळते, असे सांगत राज्यपातळीवर क्रीडा स्पर्धा दुर्लक्षित आहेत. क्रीडा हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग असावे. राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा तसेच तंत्र प्रदर्शनी आगामी काळात अमरावतीमध्ये होणार असल्याचे यावेळी प्रदीप घुले यांनी सांगितले. एमसीव्हीसी विभागाचे कुठलेही प्रकरण प्रलंबित राहू नये, याकरिता प्रयत्नशील आहे. शासकीय असो की अशासकीय सर्वांना समान न्याय देण्याचे काम करीत असल्याचे यावे घुले यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अपंग जीवन विकास संस्थेचे अध्यक्ष किशोर बोरकर, प्रमुख पाहुणे म्हणून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक प्रदीप घुले, जिल्हा

व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी राम मुळे, व्यवसाय शिक्षण व प्रादेशिक कार्यालयाचे उपसंचालक अनंत सोमकुवर, संस्थेचे सचिव दिलीप तानोडकर, आयएमएचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ. बी आर देशमुख, मराठा

महासंघाचे विभागीय उपाध्यक्ष भय्यासाहेब निचळ, सेवानिवृत्त प्राचार्य अनिल देशमुख, प्राचार्य किशोर बनसोड, एमसीव्हीसी विभागाचे प्रा. राजेश दाभाडे, सांची फाउंडेशनचे अध्यक्ष जगदीश गोवर्धन, प्रा. सुधीर ठाकरे मंचावर उपस्थित होते.प्रास्ताविक सुधीर ठाकरे यांनी केले तर प्राचार्य राजेश दाभाडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, संत गाडगे महाराज विद्यालय कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### एमसीव्हीसीला खासदार गती देतील : किशोर बोरकर

एमसीव्हीसी विभाग हा अधिकाऱ्यांच्या मानसिकतेवर चाललेला विभाग आहे. अधिका–यांच्या सकारात्मक भूमिकेमुळेच मानसिकतेवर चाललेला राबविले जात आहे, असे सांगत या विभागाचे बजेट वाढविण्यदर्शनीसारधिकारी बळ देत नसल्याची खंत किशोर बोरकर यांनी व्यक्त केला.विण्यासाठी अधिकारी विकास कार्यक्रम राबविण्यासाठी तरतूद करतात तर मग एमसीव्हीसी तिथेच का थांबते? त्यावर योग्य निर्णय सरकारने द्यावा, खासदार बळवंळ वानखडे, या विभागाला निश्चितच गती व दिशा देण्याचे काम करतील, असा आशावाद कार्यक्रमाचे अध्यक्ष किशोर बोरकर यांनी व्यक्त केला.

# मदरस्यात हातपाय बांधून बालकाशी अनैसर्गिक कृत्य

## मौलाना सलमान मुफ्ती जेरबंद, १० पर्यंत कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–**

उस्मानिया मस्जीद येथील दारुल ऊलुममदरस्यात शिकणाऱ्या १३ वर्षीय बालकाचे हातपाय बांधून व त्याला अश्लिल व्हिडीओ दाखवून त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केल्याची धकादायक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेत कोतवाली पोलिसांनी बालकाच्या वडिलाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवून मौलाना सलमान मुफ्ती (वय ३८ रा. बिच्छु टेकडी) याला अटक केली. न्यायालयाने त्याला १० तारखे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

उस्मानिया मस्जीद येथील दारुल ऊलुम मदरसामध्ये १३ वर्षीय बालक ऑक्टोबर २०२४ पासून शिक्षणाकरिता राहत होता. मदरस्यात जेवणाची व राहण्याची व्यवस्थाअसल्याने अन्य मुलेसुध्दा तिथे शिक्षणाकरिता राहत होते. २ जानेवारीला रात्री संबंधित मुलगा काही मुलांसोबत आपल्या खोलीत झोपला होता. तेव्हा अचानक चेहऱ्यावर उजेड पडल्यामुळे तो झोपेतून उठला, तेव्हा त्याला मौलाना सलमान मुफ्ती दिसले. त्यानंतर मौलाना यांनी लाईट बंद केला आणि खोलीचे दार लावून त्याच्या खोलीत गेले. काही वेळाने पीडित बालकाला लघुशंका आल्यामुळे तो खोलीच्या बाहेर आला आणि लघुशंका करून जात असताना मौलानाने त्याला आवाज दिला. त्यामुळे मुलगा त्याच्या खोलीत गेला तेव्हा मौलानाने बालकाला जवळ ओढले आणि पलंगावर झोपवून त्याचे दोन्ही पाय व हात बांधले. बालकाने ओरडण्याचा प्रयत्न केला असता मौलानाने रुमाल त्याच्या तोंडात टाकला आणि त्याला अश्लिल व्हिडीओ दाखवत त्याच्याशी जबरदस्ती अनैसर्गिक कृत्य केले. त्यानंतर बालकाचे बांधलेले हातपाय सोडले. बालक रडत खोलीत गेला आणि रात्रभर रडत राहिला. सकाळ होताच तो गावी गेला. अचानक मुलगा घाबरलेल्या अवस्थेत घरी आल्याने आई–वडिल घाबरले. त्यांनी विचारपुस केली असता त्याने घडलेला सर्व प्रकार सांगितला. तसेच यापुढे मदरस्यात शिकायला जाणार नाही आणि तुम्ही जबरदस्तीने पाठविले तर आत्महत्या करणार,असे आई–वडिलांना सांगितले. हे ऐकताच आई–वडिलांच्या पायाखालची वाळू सरकली. त्यांनी घडलेल्या घटनेबाबत नातवाईकांसोबत चर्चा केली. त्यानंतर रविवारी दुपारी त्यांनी मदरस्यात धाव घेतली आणि मौलानाला जाब विचारला. त्यानंतर चांगलाच गोंधळ उडाला. अखेर रविवारी रात्री बालकाच्या वडिलाने कोतवाली ठाण्यात तक्रार दिली.त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करुन मौलाना सलमान मुफ्तीला अटक केली.तसेच दुपारी त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १० तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. पोलीस त्याची कसुन चौकशी करीत आहेत.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन

**दि.७ अमरावती**

**विदर्भ प्रजासत्ताक** ,मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना दर्पण दिनानिमित्तविभागीय माहिती कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

विभागीय माहिती उपसंचालक अनिल आलुरकर यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.आचार्य जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी मराठी भाषेतील पहिले 'दर्पण' नावाचे नियतकालीक सुरू केले. त्यानिमित्ताने दर्पण दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो. यावेळी सहायक संचालक विजय राऊत, प्रदर्शन सहायक विश्वनाथ धुमाळ, लेखापाल श्रीमती विजया लोळगे, वरिष्ठ लिपीक दिनेश धकाते, सुनील काळे, श्रीमती वैशाली ठाकरे, लिपीक जयप्रकाश बानाईत, कॅमेरा सहायक शेख हबीब,



कुमार हरदुले, श्रीमती दिपाली ढोमणे, कांचन अंधारे, अनिल वाडाने आदी उपस्थितांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.–

# अंजनगावात दोन गटांत मारहाण दोन जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.७अंजनगाव सुर्जी** जुना बसस्थानक भागात जुन्या वैमनस्यातून दोन गटांत हाणामारी झाली. त्यात दोघे जखमी झाले. परस्परविरुद्ध तक्रारीवरून दोन्ही गटातील चौघांविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलिसांनी गुन्हे दाखल केले.

इमरान खान शफाकत खान (वय ३३) यांनी नोंदविलेल्या तक्रारीत ते व त्यांचा मित्र जुना बसस्थानक परिसरात बसले असतो संशयित शेख नाजीम यांनी फोन करून आरागिरनीवर भेटायला बोलविले. इम्रान खान व त्याचा मित्र, असे दोघे घटनास्थळी गेले असता संशयित शेख नाजीम, शेख मतीन, सय्यद नाजुद्दीन या तिघांनी वाद घालून काठ्यांनी मारहाण करून इम्रान खान यास जखमी केले. जखमीच्या तक्रारीवरून तिघा संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. परस्परविरुद्ध बाजूने सय्यद नाजुद्दीन सय्यद राजुद्दीन (वय ३३) यांनी तक्रार केली. त्यात त्यांनी काही दिवसांपूर्वी संशयित मोहंमद इम्रान अब्दुल सईद याला ५०० रुपये उधार दिले होते. त्यावरून त्यांचा व संशयित या दोघांमध्ये वाद झाला. लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण करण्यात आली. त्यात सय्यद नजुद्दीन हे जखमी झाले. जखमीच्या तक्रारीवरून अंजनगावसुर्जी पोलिसांनी संशयित मोहंमद इम्रानविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही गटांतील अद्याप कुणालाही अटक झालेली नाही.

# चायना मांजा विकला अन... पोलीस कोठडीत गेले

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.७ अमरावती** – चायना मांजा विकणाऱ्या दोघांना स्थानीक गुन्हेशाखेच्या पथकाने अटक करून ११ हजार ५०० रुपयांचा मांजा जप्त केला. अब्दुल कुद्दुस अब्दुल रऊफ (वय ३०) आणि मोहम्मद सादीक अब्दुल सत्तार (वय ५५ दोन्ही रा. नया प्लॉट माहुली जहागीर) अशी अटकेतील दोघांची नावे आहेत.स्थानीक ग्रामीण गुन्हेशाखेचे पथक रविवारी माहुली जहागीर परिसरात गस्तीवर असताना नया प्लॉट येथील रहिवाशी अब्दुल कुद्दुस स्वतःच्या घरातून मोठ्या प्रमाणात



शासनाकडुन प्रतीबंधीत असलेला चायना मांजा विक्री करीत असल्याची माहिती मिळताच अधिकाऱ्यांनी त्याच्या घरी धाड टाकली आणि पुर्ण घराची झडती घेतली असता वेगवेगळ्या कंपनीचे ४९ बंडल किंमत ११ हजार ५०० रुपयांचा माल जप्त करुन दोघांना अटक केली.या कारवाईत स्थानीक गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे, पोलीस उपनिरीक्षक सागर हटवार, पोलीस कर्मचारी बळवंत दाभणे, गजेंद्र ठाकरे, रविंद्र बावणे, भूषण पेठे, पंकज फाटे आणि विलास रावते यांचा समावेश होता.

# आरोग्याच्या नियमितपणे तपासणीतुन निरोगी जीवनशैली अंगीकारणे गरजेचे -आ.सुलभा खोडके

## शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.७अमरावती**

समाजासाठी दिवस रात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस बांधवांचे आरोग्याच्या दृष्टीने पोलीस आयुक्तालय अमरावती शहर च्या वतीने पोलीस वर्धापन दिन निमित्ताने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन पोलीस कवायत मैदान येथे करण्यात आले. यात हृदयरोग तपासणी मधुमेह, दैनंदिन आरोग्याची घ्यावयाची काळजी, वजन नियंत्रित ठेवणे आदी बाबत





तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके, पोलीस आयुक्त अमरावती शहर नवीनचंद्र रेड्डी , पोलीस उपायुक्त गणेश शिंदे , श्रीमती कल्पना बारवकर , यश खोडके, पीडीएमसीचे अधिष्ठाता डॉ. ए. टी.देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने पोलीस अधिकारी व कर्मचारी अनेक तपास , बंदोबस्त व कार्यवाही साठी तत्पर असल्याने त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते . म्हूनच पोलिस कर्मचाऱ्यांच्या ताण-तणाव कमी व्हावा, निरोगी जीवनशैली व त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी तपासणी शिबिराचे आयोजन उल्लेखनीय व प्रशंसनीय आहे. पोलीस कल्याणासाठी आपण सदैव तत्पर राहू , असा विश्वास आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केला .पुढे बोलतांना आमदार महोदयांनी शहर पोलीस विभागाच्या गतिशील व कार्यतत्पर कामकाजाची प्रशंसा केली. यावेळी पोलीस आयुक्तालयाच्या वतीने आमदार महोदयांसमवेत सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .

या शिबिरामध्ये बी. पी. ,शुगर ,श्वसन रोग , ईसीजी , हृदयरोग , स्त्रीरोग ,बाल रोग , नाक कान घसा , दंत चिकित्सा , अस्थिरोग आदी संदर्भात तपासणी , वैद्यकीय सल्ला व औषधोपचार करण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिराचा अमरावती शहर पोलीस आयुक्तालय अधिनस्त सर्व दहाही ठाण्याचे पोलीस अधिकारी , कर्मचारी तसेच पोलीस कुटुंब यांनी लाभ घेतला.

# केवायसीच्या फेऱ्यात अडकले पोलिस पाटलांचे मानधन

### तीन महिन्यांपासून जिल्ह्यातील पोलिस पाटील मानधनाच्या प्रतीक्षेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७मोर्शी** - पोलिस पाटलांच्या मानधन वाढीचा



निर्णय राज्य सरकारने मार्च महिन्यात घेतला. त्यामुळे पोलिसपाटलांना वाढलेल्या मानधनाने दिलासा मिळाला व पोलिसपाटलांना वाढीव मानधन शासनाने देणे सुरू केले. मात्र पोलिसपाटलांचे मानधन केवायसीच्या फेऱ्यात अडकले आहे. परिणामता पोलिसपाटलांचे मानधन झाले नसल्याने पोलिसपाटील आर्थिक अडचणीत सापडले आहेत.राज्यात सर्वच कर्मचाऱ्यांचे पगार नियमित व वेळेवर होतात. मात्र पोलिसपाटलांच्या मानधनाची अनियमितता संपता संपत नसल्याने पाटलांना नेहमीच मानधनासाठी ताटकळत राहावे लागते. मागील महिनाभरापूर्वी पोलीस प्रशासनाच्या वतीने, पोलिसपाटलांचे केवायसी करण्याकरिता म्हणून बँक पासबुक, कॅन्सल चेक, आधारकार्ड, पॅनकार्ड,आदी कागदपत्रे प्रशासनाने मागविली होती.मात्र महिनाभराचा कालावधी होऊनही मानधन दिले गेले नसल्याने संताप व्यक्त केल्या जात आहे.

गावखेड्यात हजर राहून पोलिस पाटीलकी करीत असताना शासनानेच दिलेल्या मानधनावर अनेकांचे कुटुंब विसंबून आहेत. मानधना व्यतिरिक्त उत्पन्नाचे दुसरे साधन पोलिसपाटलांकडे नाही. परिणामतः मानधन नियमित होत नसल्याने पोलिसपाटलांचे आर्थिक गणित बिघडत आहे. गावात पोलिस पाटील पद हे मानाचे असल्याने कोणाकडे मजुरीही करू शकत नाही आणि कुणाकडे पैसेही मागू शकत नाही. त्यामुळे पोलिसपाटील आर्थिक कोंडीत सापडले आहेत.राज्यातील इतरही कर्मचाऱ्यांप्रमाणेच पोलिसपाटलांचेही मानधन नियमित व वेळेवर व्हावे यासाठी पोलिसपाटलांच्या संघटनांनी प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी केली. मात्र प्रशासन पोलिसपाटलांचा या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याने नाराजीचा सूर आहे.

### पोलिस पाटलांना अनेक कामे

गावागावांतील शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करण्यासह गावातील सण-उत्सव शांततेत पार पडावे, आरोपींचा ठावठिकाण कळवून त्यास पकडून देण्यास पोलिसांना मदत करणे, गावातील भांडण तंटे मिटविणे, पोलिसांना तपासकार्यात मदत करणे, कायदा सुव्यवस्था व जातीय सलोखा बिघडण्याची शक्यता असणाऱ्यांची माहिती देणे, महसूल आणि पोलिस खात्यांना वेळोवेळी आवश्यक ती माहिती देणे यासारखी कामे करणारे गावातील महत्त्वाचे पद म्हणजे पोलिसपाटील पद आहे.

# मेंढपाळांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी मदत- जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती,**

परराज्यातील मेंढ्यांना जिल्ह्याच्या हद्दीत निर्बंध घालणे आणि लसीकरण प्रभावीपणे राबवून आजार संक्रमण रोखण्यासाठी जिल्ह्यात उपाययोजना करण्यात येतील. तसेच मेंढपाळांचे प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली.



जिल्हाधिकारी कार्यालयात मेंढपाळांच्या प्रश्नाबाबत शिष्टमंडळासोबत बैठक घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांच्यासह पशूसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी, जिल्हा प्रशासनातर्फे मेंढपाळांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. जिल्ह्यात इतर राज्यातील जनावरे येण्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे प्राधान्याने परराज्यातून आलेल्या मेंढीसह इतर जनावरांना जिल्ह्याच्या हद्दीवर रोखण्यासाठी पावले उचलण्यात येतील. त्यांच्या लसीकरणाबाबत माहिती घेतल्यानंतरच त्यांना जिल्ह्यात प्रवेश देण्यात येईल. तसेच स्थानिक जनावरांना लसीकरणासाठी विशेष पथके निर्माण करण्यात येतील. यात सुटलेल्या जनावरांचे लसीकरण करण्यात येईल. परराज्यातील जनावरांच्या संसर्गामुळे स्थानिक पशूंना हानी होऊ नये, यासाठी दक्षता घेण्यात येतील.

परराज्यातील जनावरांच्या रक्ताचे नमूने घेऊन तपासणीसाठी पाठविण्यात यावे. याचा अहवाल तातडीने मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. यामुळे संसर्गजन्य आजारावर आळा बसू शकेल. तसेच मेंढपाळांच्या घरकुलाचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल. यासोबतच अपघातात मेंढपाळांचा मृत्यू झाल्यास सानुग्रह अनुदान, मेंढपाळावरील नोंदविण्यात आलेले गुन्हे, घरकुल योजनेचा लाभाबाबत सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्यात येणार असल्याचे कटियार यांनी सांगितले.

# प्रजासत्ताक दिनी जिल्ह्यात शाळांनी प्रभातफेरी, भाषण, नृत्य स्पर्धा घ्याव्या

### शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने परिपत्रकाद्वारे दिल्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती** - प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी जिल्ह्यातून शाळांकडून प्रभातफेरी, भाषण स्पर्धा, नृत्य असे उपक्रम राबवावे, अशा सूचना शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाने दिल्या आहेत. या कार्यक्रमात पूर्ण दिवस जातो म्हणून २६ जानेवारीला शाळांना सुटी नसेल.

प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्याच्या शिक्षण विभागाकडून दरवर्षी परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात. परिपत्रकात दिलेल्या सूचनांचे पालन शाळांना करावे लागणार आहे. प्रजासत्ताक दिनी सर्व माध्यमाच्या शासकीय, खासगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांनी विविध उपक्रम राबवावे. स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ व प्रतिष्ठित नागरिक यांचा सहभाग असावा, अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्या. त्याची अंमलबजावणी शाळांना करायची आहे. यामध्ये यामध्ये झेंडावंदनानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत गायन,



राज्यघटनेच्या सरनाम्याचे वाचन, देशभक्तीपर गीत गायन करावे. गावात प्रभातफेरी काढावी. तसेच विद्यार्थ्यांसाठी स्वातंत्र्यसैनिक, देशभक्ती, लोकशाही आर्दीवर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करावी. देशभक्तीपर कविता वाचन करावे. देशभक्तीपर गाण्यांवर नृत्य, चित्रकला स्पर्धा तसेच देशभक्ती, स्वातंत्र्य लढा या विषयांवर निबंध लिहिण्याची स्पर्धा आयोजित करावी. विद्याथ्यर्थ्यांनी तयार केलेल्या हस्तकला, चित्रकला इत्यादींची प्रदर्शन शाळेत आयोजित करावी, अशा सूचना परिपत्रकात आहेत, अशी माहिती कळवण्यात आली आहे.

# तालुकास्तरीय क्रीडा व उल्लास मेळाव्याचे आयोजन ७ व ८ जानेवारीला

### मन्नालाल गुप्ता विद्यालयात विद्यार्थ्यांची मांदीयाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७चांदूर रेल्वे**

पंचायत समिती चांदूर रेल्वे अंतर्गत जिल्हा परिषद तालुका स्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सव तथा उल्लास मेळाव्याचे आयोजन दिनांक ७ व ८ रोजी करण्यात आले आहे. श्री मन्नालाल गुप्ता विद्यालय येथे आयोजित या सोहळ्याचे उद्घाटन दिनांक ७ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता धामणगाव रेल्वे मतदार संघाचे आमदार प्रतापदादा अडसड यांचे हस्ते होणार असून यावेळी अध्यक्षपदी गटविकास अधिकारी तेजश्री आवळे ह्या राहणार आहेत.

या कार्यक्रमाला माजी सभापती प्रशांत भेंडे, माजी उपसभापती शुभांगीताई खंडारे, माजी सदस्या सरिताताई देशमुख, प्रतिभाताई डांगे, प्रितीताई तिजारे, अमोल होले, सहा गटविकास अधिकारी संजय खारकर, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य अशोकराव देशमुख, मुख्याध्यापक नितीन कडू, गणेश चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दिनांक ८ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता बक्षीस वितरण सोहळा गटविकास अधिकारी तेजश्री आवळे यांचे अध्यक्षेत होणार असून उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांचे हस्ते बक्षीस वितरण होणार आहे.

# आता लढा मथुरा श्रीकृष्णजन्मभूमी मुक्तीचा !- पू. देवकीनंदन ठाकूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ बेंगळुरू : -** अयोध्येत श्रीराम मंदिर बनले. जय श्रीराम पूर्ण झाले. आता तुम्ही (हिंदू) मथुरेला येणार कि नाही ? मथुरेत जन्मभूमी बनवायची आहे कि नाही ? 'बहुत सह लिया, अब ना सहेंगे; हिंदू हक अब लेकर रहेंगे !' या प्रभावी घोषणेने प्रसिद्ध कथावाचक पू. देवकीनंदन ठाकूर मथुरा येथील श्रीकृष्णजन्मभूमी मुक्तीसाठी हिंदूंना पुढे येण्याचे आवाहन केले. कर्नाटक राज्यातील बेंगळुरू येथे 'कर्नाटक मंदिर महासंघ' आणि 'हिंदु जनजागृती समिती' यांच्या वतीने आयोजित द्वितीय 'कर्नाटक मंदिर अधिवेशन'त ते बोलत होते. या वेळी राज्यभरातील मंदिर विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित आणि मंदिर संरक्षणासाठी लढणारे अधिवक्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या वेळी पू. देवकीनंदन ठाकूर पुढे म्हणाले की, जसे मुसलमानांचे धार्मिक स्थळांच्या रक्षणासाठी वक्फ बोर्ड आहे, तसे हिंदूंची मंदिरे मुक्त करून त्यांच्या व्यवस्थापनासाठी 'सनातन बोर्ड' बनवणे आवश्यक आहे. संस्कृतीचे संरक्षण हवे असेल, तर मंदिरांचे रक्षण आवश्यक आहे आणि हे केवळ हिंदू एकत्र आल्यास शक्य आहे, असे सांगत त्यांनी उपस्थितांना मंदिर संरक्षणासाठी लढा देण्याचे आवाहन केले.कर्नाटक राज्यातील 'गंगम्मा तिम्मय्या कन्व्हेन्शन हॉल', बसवेश्वरनगर, बेंगळुरूमध्ये मंदिर संस्कृतीच्या रक्षणासाठी मंदिर विश्वस्तांच्या मंदिर अधिवेशनाचा प्रारंभ शंखनादाने झाला. या वेळी पू. रामानंद गौडा, धर्मप्रचारक, सनातन संस्था; ज्येष्ठ अधिवक्ता प्रमिला नेसरगी, कर्नाटक उच्च न्यायालय; श्री. नंदकुमार आयएएस, माजी आयुक्त, मुजराई विभाग, कर्नाटक सरकार; पद्मश्री श्री. आर. व्ही. गौरीशंकर, माजी प्रशासकीय अधिकारी, श्रृंगेरी महासंस्थान आणि श्री. सुनील घनवट, राष्ट्रीय संघटक, मंदिर महासंघ यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते 'रुग्णाची सेवाशुश्रूषा साधना म्हणून कशी करावी ?' या सनातननिर्मित कन्नड भाषेतील लघुग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. भारतभर मंदिर महासंघाच्या कार्याला हिंदू समाजाकडून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. कर्नाटक राज्यातील मंदिरांच्या संवर्धनासाठी आणि रक्षणासाठी हिंदूंनी एकत्र यावे, असे आवाहन कर्नाटक मंदिर महासंघाचे संघटक मोहन गौडा यांनी केले.

# रात्रीच्या वेळी नागपूर पोलिसांचा अंजनगावच्या नदीपात्रात तपास

### पोलिसांच्या शोधमोहिमेने नागरिक बुचकळ्यात, चर्चांना उधान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अंजनगाव सुर्जी** - रात्रीच्या अंधारात अंजनगाव सुर्जीच्या शहानूर नदीपात्रात नागपूर पोलिसनी शोध मोहिम राबविली. या शोध मोहिमेमुळे नागरिक बुचकळ्यात पडले असून याबाबत स्थानिक पोलिसांनाही काहीच माहित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. फार तपशिलात गेल्यानंतर नागपुरात पकडल्या गेलेल्या एका आरोपीने येथे शस्त्र फेकले आहे. त्याचा शोध घेण्यासाठी नागपुरचे पोलिस याठिकाणी आले आहेत.


प्राप्त माहितीनुसार नागपूर येथील एका मोठ्या घटनेतील तपासासाठी गेल्या दोन-तीन दिवसापासून नागपूर येथील पोलीस अधिकाऱ्यांचे एक पथक अंजनगाव सुर्जी येथे दाखल झाले आहे. त्यांच्याद्वारे शहानुर नदीपात्रात रात्रीच्या अंधारात काहीतरी शोध घेतला जात आहे. शनिवारी रात्रीही अशीच शोध मोहिम सुरु होती. त्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांचा मोठा जमाव तेथे जमला होता. मात्र कुणालाच काही माहित नसल्याने सर्वजण एक-दुसऱ्याला खुणा करुन विचारत होते. नागपुरचे प्रकरण नेमके काय ? पोलीस अंधारात काय शोधत आहेत ? असे काही प्रश्न नागरिक एकमेकांना विचारत होते. परंतु सत्य माहिती नागपूर पोलीस नागरिकांना सांगत नसल्याने संपूर्ण शहरात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले होते. काही ठिकाणी भीतीचे वातावरण सुद्धा निर्माण झाले होते.

# जिल्हा आरोग्य यंत्रणा अलर्ट मोडवरएचएमपीव्हीच्या रुग्णांसाठी

## जिल्हा सामान्य रुग्णालयात २० बेडची विशेष व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** चीनमध्ये सध्या एचएमपीव्ही या संसर्गजन्य आजाराचा मोठ्या प्रमाणावर उद्रेक झाला असून भारतात आरोग्ययंत्रणेकडून सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यादृष्टीने जिल्ह्याची आरोग्ययंत्रणादेखील अलर्ट मोडवर आली असून आपातकालीन परिस्थितीत धावपळ होऊ नये, यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात या आजाराच्या रुग्णांवर उपचारासाठी स्वतंत्र कक्षासह २० बेड्सची व्यवस्था करण्यात आली आहे.



सुदैवाने जिल्ह्यात या आजाराचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही. मात्र आरोग्ययंत्रणेकडून काटेकोरपणे काळजी घेतली जात आहे.वैद्यकीय तज्ञांच्या मते हा एक सामान्य विषाणू असून तो श्वसनमार्गाच्या संसर्गास कारणीभूत ठरतो. हा एक हंगामीआजार असून फ्लूप्रमाणे हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरवातीला त्याची साथ उद्भवते.सध्या चीनमध्ये या आजाराचा उद्रेक पाहायला मिळत असून महाराष्ट्रात आतापर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. मात्र खबरदारीचा उपाय म्हणून आरोग्य विभागाकडून मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्या सुचनांचे पालन करण्याचे आदेश आरोग्ययंत्रणेला देण्यात आले आहे.गतकाळात अमरावती जिल्ह्यातकोरोनाचा प्रादुर्भाव अतिशय वेगाने झाला होता, तशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये, यासाठी आरोग्ययंत्रणा अलर्ट झालेली आहे.जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वतंत्र वॉर्डासह स्वतंत्र बेड्स व स्टाफची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

शहर अथवा जिल्ह्यात या आजाराचे रुग्ण आढळून आलेले नाहीत. ६६ कुठेहीखबरदारीच्या उपाययोजना केल्या जात असून जिल्हा सामान्य रुग्णालयात २० बेड्सची व्यवस्था ठेवण्यात आली आहे. राज्य टास्क फोर्सकडून देण्यात येणाऱ्या सुचनांचे तंतोतत पालन केले जाईल. तसेच नागरिकांनीही सुचविलेल्या उपाययोजना पाळाव्या.

**डॉ. दिलीप सौंदळे,** जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय.

# आता गोड खाणं महागणार

## साखरेचे दर थेट ११ रुपयांनी वाढणार?

### केंद्र सरकारने दिले संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

मागच्या काही काळात झपाट्याने वाढलेल्या महागाईमुळे सर्वसामान्यांचं आर्थिक गणित कोलमडून गेलं आहे. दैनंदिन वापरातील अनेक अन्नपदार्थ जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढल्याने घरखर्चामध्येही वाढ झाली आहेत. त्यातच आता केंद्र सरकारने शेतकरी आणि साखर संघटनांनी केलेली मागणी मान्य केल्यास गोड खाणंही मोठ्या प्रमाणात महागणार आहे. त्याचं कारणं म्हणजे साखरेच्या किमान विक्री मूल्यामध्ये (एमएसपी) वाढ करण्याची मागणी बऱ्याच काळापासून केली जात आहे. साखरेच्या एमएसपीमध्ये २०१९ पासून वाढ करण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर सरकारने साखरेची एमएसपी वाढवल्यास बाजारामध्ये साखरेचे दर निश्चितपणे मोठ्या प्रमाणावर वाढणार आहेत.

अन्न आणि ग्राहक विषयक मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितले की, सरकार लवकरच सखरेच्या किमान विक्री मूल्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेणार आहे. सध्या साखरेची किमान एमएसपी ३१ रुपये प्रति किलो आहे. हा दर २०१९ च्या फेब्रुवारी महिन्यात निश्चित करण्यात आला होता. तेव्हापासून साखरेच्या एमएसपीमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. मात्र साखर उद्योगांमधील वाढता उत्पादन खर्च आणि साखर कारखान्यांसमोर निर्माण होत असलेल्या आर्थिक प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर दरांमध्ये वाढ करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे.



केंद्रीय मंत्री जोशी यांनी सांगितले की, एमएसपी वाढवण्याची मागणी केली जात आहे. आमच्या विभागाला याबाबतची कल्पना आहे. आता एमएसपी वाढवायची की नाही याबाबत आम्ही लवकरच निर्णय घेणार आहोत. भारतीय साखर आणि जैविक उर्जा निर्माता संघटना (इस्मा) आणि राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाकडून साखरेचा किमान विक्रीदर हा ३९.१४ रुपये प्रतिकिलो किंवा ४२ रुपये प्रतिकिलोपर्यंत वाढवण्याची मागणी करण्यात येत आहे.

साखरेच्या किमान विक्री मूल्यामध्ये वाढ केल्यास त्यामुळे देशातील साखर कारखान्यांची आर्थिक सुधारण्यास मदत होईल, असे इस्माने सांगितले. मात्र मागणीप्रमाणे साखरेच्या किमान हमीभावामध्ये वाढ करण्यात आल्यास त्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशावर मात्र फार मोठा ताण पडणार आहे.

# भाजप उमेदवाराची न्यायालयात धाव

## विधानसभा निवडणुकीत घोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

विधानसभा निवडणुकीत कायदेशीर प्रक्रियेचे पालन न झाल्याचा तसेच ईव्हीएमच्या माध्यमातून घोळ केला असल्याचा दावा करणाऱ्या आठ निवडणुक याचिका शनिवारी दाखल झाल्या होत्या. यात जवळपास सर्वच याचिकाकर्ते महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील पराभूत उमेदवार आहेत. सोमवारी महाविकास आघाडीच्या आणखी पाच उमेदवारांनी न्यायालयात धाव घेण्याचा निर्णय घेतला. नव्या याचिका प्रक्रियेचे पालन करून मंगळवारी दाखल होण्याची शक्यता आहे. निवडणूक याचिकांच्या या पावसात सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील पराभूत भाजप उमेदवार विजय कमलकिशोर अग्रवाल यांनी दाखल केलेली निवडणूक याचिका आहे. भाजपचे अग्रवाल यांनी निवडणूक घोळ झाल्याचा आरोप करत काँग्रेसचे विजयी उमेदवार



साजीद खान पठाण यांच्या विजयाला न्यायालयात आव्हान दिले आहे. मतदान केंद्रावर डबल व्होटींग झाल्यामुळे काँग्रेसचे साजिद खान निवडून आले आहेत. त्यामुळे त्यांची निवडणूक रद्द करावी, अशी मागणी विजय अग्रवाल यांनी याचिकेत केली. याशिवाय काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार नारायण जांभुळे यांनी याचिका दाखल केली आहे.

**या उमेदवारांना निवडणुकीवर शंका**

काटोल विधानसभा मतदारसंघातून लढलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) उमेदवार सलील देशमुख यांनी भाजपचे चरण ठाकूर यांच्या विजयाला आव्हान देतील. याखेरीज हिंगणा मतदारसंघातील रमेशचंद्र बंग, अकोला जिल्ह्यातील आकोट मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार ॲड. महेश गणगणे, तुमसर येथील राष्ट्रवादी पक्षाचे (शप) चरण वाघमारे आणि बुलढाणा मतदारसंघातील शिवसेनेच्या (उबाठा) ॲड. जयश्री शेळके या सुद्धा याच प्रकारच्या याचिका दाखल करणार आहेत. सोमवारी या उमेदवारांनी न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्याचे प्रयत्न केले, मात्र न्यायालयाकडून त्यांची याचिका दाखल झाली नाही. आज, मंगळवारी ही प्रक्रिया पूर्ण होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. यापूर्वी शनिवारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याविरुद्ध नागपूर दक्षिण पश्चिममधून निवडणूक लढविलेले काँग्रेसचे प्रफुल्ल गुडधे, दक्षिण नागपूरचे उमेदवार गिरीश पांडव, अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदारसंघातील उमेदवार; तसेच माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, सुभाष धोटे, शेखर शेंडे, संतोषसिंग रावत, सतीश वारजूरकर यांनी शनिवारी निवडणूक याचिका याचिका दाखल केल्या होत्या. याचिकांनुसार, ईव्हीएमद्वारे निवडणूक घेण्यापूर्वी ज्या कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता करावी लागते ती निवडणूक आयोगाने केली नाही. ईव्हीएमद्वारे घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीतील निकषांचेही पालन झालेले नाही. निवडणुकीच्या निकालानंतर पराभूत उमेदवारांनी मागणी केल्यानंतरही सीसीटीव्हीचे फुटेज, फॉर्म नंबर-१७ देण्यात आले नाही, असे अनेक दावे याचिकेत करण्यात आले आहेत.

# बीडच्या आरोपींना मोक्का लावा, बिनभाड्याच्या खोलीत ठेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७ मुंबई**

संतोष देशमुखचा गुन्हा काय होता? गावातील एक दलित वॉचमनला मारहाण होताना तो रोखायला गेला, खंडणी मागणाऱ्यांना विरोध केला म्हणून त्याची निर्घुण हत्या केल्याचा आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला. संतोष देशमुखच्या मारेकऱ्यांना मोक्का लावा, त्यांना बिनभाड्याच्या खोलीत ठेवा अशी मागणी त्यांनी केली. या आरोपींना त्यांच्या नातेवाईकांना आणि मित्रमंडळींना भेटू देऊ नका, त्यांची तेरे नाम चित्रपटातील सलमान खान सारखी अवस्था झाली पाहिजे असा टोलाही सुरेश धस यांनी लगावला. मुंबईतील सरपंच परिषदेमध्ये सुरेश धस बोलत होते.

गावासाठी चांगलं काम करणाऱ्या संतोष देशमुखची हत्या झाली. तो पुढे जाऊन जिल्हा परिषद सदस्यही झाला असता. पण त्याची निर्घुण हत्या केल्यामुळे कोणताही सरपंच समाजसेवेचं काम करण्यासाठी पुढे येणार नाही. त्यामुळे सर्वांनी मिळून संतोष देशमुखच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल याची काळजी घ्यायला पाहिजे असं आवाहन आमदार सुरेश धस यांनी केलं.

# धनंजय मुंडेंवर आक्षेपार्ह वक्तव्य करणे भोवले

## मनोज जरांगे पाटलांवर बीडमध्ये ४ ठिकाणी गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ बीड**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर बीड जिल्ह्यातील ४ पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. परभणी येथील जनआक्रोश मोर्चामध्ये त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला होता. मोर्चात बोलताना त्यांनी मुंडेंसह वंजारी समाजाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मनोज जरांगे पाटलांच्या विधानामुळे वंजारी समाज आक्रमक झाला आहे.



बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी परभणीमध्ये परवा (४ जानेवारी) जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील सहभागी झाली. दरम्यान मोर्चात जमलेल्या लोकांना संबोधताना मनोज जरांगे पाटलांनी धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी बोलताना काही आक्षेपार्ह शब्द वापरल्याने मुंडे समर्थकांनी नाराजी व्यक्त केली आहे.परळीमध्ये भाषणामध्ये केलेल्या वक्तव्यामुळे बीड जिल्ह्यातील विविध ४ पोलीस ठाण्यांमध्ये मनोज जरांगे पाटलांविरुद्ध गुन्हे दाखल झाले आहेत. परळी, बीडनंतर अंबाजोगाई आणि धारुरमध्ये अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. धनंजय मुंडे यांच्यासह वंजारी समाजाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने हा गुन्हा दाखल झाला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडेंवर टीका करताना वादग्रस्त विधान केले, त्यांनी वंजारी समाजाविषयीही आक्षेपार्ह वक्तव्य केले. यावरुन मुंडे समर्थक आक्रमक झाले आहे. आता मनोज जरांगेंवर गुन्हा दाखल झाल्यानंतर सुरेश धस, संदीप क्षीरसागर, बजरंग सोनावणे यांच्यासह अंजली दमानिया यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी बीडमधील मुंडे समर्थक करत आहेत. आता या प्रकरणी ठिकठिकाणी आंदोलने सुरु असून संताप व्यक्त केला जात आहे.

# समृद्धी महामार्ग दिल्लीला जोडला जाणार, नवा एक्स्प्रेसवे तयार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

मुंबई ते नागपूर या दोन महानगरांना जोडणारा समृद्धी महामार्ग आता देशाची राजधानी दिल्लीशी जोडला जाणार आहे. ४.२ किमी लांब आमने ते बडोदा - मुंबई द्रुतगती मार्ग पूर्ण झाला आहे. फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस महामार्ग प्रकल्पाचा शेवटचा टप्पा पूर्ण होणार आहे. त्यानंतर दोन ते तीन महिन्यांमध्ये हा महामार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग या ७०१ किमी लांब महामार्गामुळे मुंबई ते नागपूर हे अंतर वीस तासांवरून आठ तासांवर आला. हा देशातील सर्वात लांब द्रुतगती




महामार्ग आहे. ६२५ किमी लांब हा महामार्ग इगतपुरी-नागपूर-इगतपुरी अशा तीन टप्प्यांमध्ये सुरु आहे. आता हा महामार्ग थेट दिल्लीशी संलग्न होणार आहे. त्याच्या जोडरस्त्याचेही काम पूर्ण झाले आहे.

बडोदा-मुंबई द्रुतगती महामार्ग नव्याने उभारला जात आहे. एनएचएआयच्या मुंबई मुख्यालयांतर्गत सर्व १०३ किमी लांब रस्त्याच्या कामासाठी कंत्राटदार नियुक्त करण्यात आला आहे. रस्त्याच्या बांधकामाला सुरुवातही झाली आहे. जून महिन्यापर्यंत बांधकाम पूर्ण होईल असा अधिकाऱ्यांना विश्वास आहे. हा महामार्ग दक्षिणेकडे आमनेनंतर अंबरनाथजवळील भोज आणि तिथून पुढे मोरबेपर्यंत (तळोजाची पूर्व बाजू) तयार केली जाणार आहे. त्यानंतर महामार्ग जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरणापर्यंत (जेएनपीए) नेला जाणार आहे.

समृद्धी महामार्गामुळे राज्याची राजधानी मुंबई आणि उपराजधानी नागपूर या दोन शहरांसह १४ जिल्ह्यांमधील दळणवळणाचे प्रमाण वाढत आहे. आता नव्या महामार्गामुळे समृद्धी महामार्ग दिल्लीला जोडला जाईल. ४.२ किमी स्पर रोड बांधण्यात एका गोदामाचा अडथळा आला होता. या गोदामाची जागा बदलण्याचे आल्याने रस्ता पूर्णपणे तयार झाला आहे आणि समृद्धी महामार्गाचा अखेरचा टप्पादेखील पूर्ण झाला आहे. एमएसआरडीसीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी सांगितले आहे.

# दोन वर्षांचे जिल्हा क्रीडा पुरस्कार एकाच वेळी

## गतवर्षी निधीअभावी आयोजनच टाळले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राज्य शासनाच्या क्रीडा धोरणानुसार २०२२-२०२३ व २०२३-२०२४ अशा दोन वर्षांचे जिल्हा क्रीडा पुरस्कार २०२५ मध्ये एकाच वेळी वितरित केल्या जातील. मागील आर्थिक वर्षात निधीच उपलब्ध नसल्यामुळे हे आयोजन टाळले होते.

जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक ज्यामध्ये महिला, पुरुष व दिव्यांग खेळाडूंचा सहभाग राहणार आहे. १० हजार रुपये रोख, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या क्रीडाक्षेत्रात काम करणाऱ्या मार्गदर्शक आणि खेळाडू यांच्याकडून त्यासाठी प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारासाठी सतत दहा वर्षे मार्गदर्शक म्हणून कार्य असणे आवश्यक आहे. शिवाय वयाची ३० वर्षे पूर्ण असावी. गुणांकरिता जिल्ह्यातील खेळाडूंची कामगिरी ग्राह्य धरल्या जाईल. दहा वर्षांत किमान वरिष्ठ गटातील राज्य पदक विजेते तसेच कनिष्ठ राष्ट्रीय, शालेय, ग्रामीण व महिलाखेलो इंडियामधील राष्ट्रीयस्तरापर्यंतचे पदके, विजेते खेळाडू तयार केलेले असावे.

सांघिक अथवा वैयक्तिक मान्यता क्रीडाप्रकारात राष्ट्रीयस्तर, वरिष्ठ गट, अशा क्रीडास्पर्धेत प्रतिनिधित्व घडविणारा मार्गदर्शक यांना या



गटातून प्रस्ताव पाठविता येईल.महिला, पुरुष व दिव्यांग खेळाडू गटातून लगतच्या पाच वर्षे, दोन वर्षे त्या जिल्ह्याचे मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असावे. खेळाडूंची अधिकृत राज्य, राष्ट्रीय शालेय व केंद्र शासनामार्फत आयोजित क्रीडा स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी लक्षात घेतल्या जाणार आहे. उत्कृष्ट ठसा उमटविणाऱ्या तीन वर्षांतील कामगिरीचा विचार केल्या जाणार आहे. आशियाई स्पर्धा, कॉमनवेल्थ,गेम, जागतिक चषक, क्रीडास्पर्धा, आशियाई गेम्स, राष्ट्रकुल स्पर्धा, सहभागी होणाऱ्यांना थेट पुरस्कार देण्यात येईल. त्यासाठी संघटनेने अथवा वैयक्तिकरीत्या जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाकडे १५ जानेवारीपर्यंत प्रस्ताव पाठवावे लागणार आहेत.

# नागपुरात सहायक आरटीओ एसीबीच्या जाळ्यात : फक्त चारशे रुपयांची मागितली लाच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ नागपूर**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सोमवारी (ता.६) दुपारच्या सुमारास ग्रामीण प्रादेशिक परिवहन विभागाच्या प्रभारी अधिकारी आणि एजंटला ४०० रुपयाची लाच घेताना रंगेहात अटक केली. याप्रकरणी कपिलनगर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अशफाक अहमद मेहमूद आणि एजंट मिर्झा असराग बेग अशी



आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रार देणाऱ्या व्यक्तीच्या परिचित असलेल्या दोन व्यक्तींनात्यांच्या नावावर असणाऱ्या तीन वाहनांचे हस्तांतरण करायचे होते. दरम्यान ते हस्तांतरण करण्यासाठी कोणतीही त्रुटी काढण्यात येऊ नये, यासाठी कार्यालयातून पैशाची मागणी करण्यात आली होती. ३ तारखेला याबाबत कार्यालयातून ४०० रुपयाची मागणी करण्यात आली. मात्र, ते पैसे देण्याची तयारी नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. तक्रारीची शहानिशा केल्यावर पथकाने सोमवारी (ता.६) सापळा रचला. यावेळी मिर्झा असराग बेग याने लाच स्वीकारताच, पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याने हे पैसे अशफाक यांनी घेण्यास सांगितले.

# मुदतवाढीनंतर केवळ ८३७ शेतकऱ्यांची नोंदणीसोयाबीन खरेदीत शासकीय अनास्था, पोर्टलवरील अडचणी कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

नाफेडने पोर्टलवरील अडचणी दूर न केल्याने मुदतीअखेर शेकडो शेतकऱ्यांना नोंदणी करता आलेली नाही. मुदतवाढीनंतर आतापर्यंत केवळ ८३७ शेतकऱ्यांची नोंदणी होऊ शकली आहे. पोर्टलवरील अडचणी दूर करण्याची वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही त्या दूर न करण्यात आल्याने त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसला आहे.

राज्य सरकारने राज्यभरात हमीदराने सोयाबीन खरेदीसाठी १४ लाख १३ हजार मेट्रिक टन इतके लक्षांक निर्धारित केले आहे. आतापर्यंत या लक्षांच्या तुलनेत तीस टक्केही खरेदी होऊ शकलेली नाही. खरेदीसाठी शेतकऱ्यांसमोर ठेवलेल्या अटी व शर्थी जाचक ठरत असतानाच नोंदणीतही अडचणी कायमच ठेवल्याने शेतकऱ्यांना हमीदराने सोयाबीन विक्री करता आलेला नाही. यामुळे सरकारला खरेच शेतकऱ्यांचा सोयाबीन खरेदी करायचा होता व हमीदर देत दिलासा द्यायचा होता का? असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. नोंदणीसोबतच आता बारदाण्याच्या टंचाईचाही प्रश्न निर्माण झाला आहे. बारदाण्याची संभाव्य टंचाई बघता खरेदीची गतीही कमी ठेवण्यात आली होती. अमरावती जिल्ह्यात नाफेडने वीस खरेदी केंद्रे सुरू केली



**नाफेडची एकूण केंद्रे : २०**
**एकूण नोंदणी : १८,९४७**
**मुदतवाढीनंतर नोंदणी : ८३७**
**एकूण खरेदी : १ लाख ६७ हजार ५२**

असून एकूण एक लाख ६७ हजार ५२ क्विंटल सोयाबीनची खरेदी केली आहे.खरीप हंगामातील कापसापाठोपाठ सोयाबीन हे कोरडवाहू पट्ट्यातील मुख्य पीक आहे. खुल्या बाजारात दर पडले असल्याने सरकारने निवडणुकीच्या तोंडावर शासकीय खरेदीची घोषणा केली. राज्यासाठी १४ लाख १३ हजार मेट्रिक टन खरेदीचे उद्दीष्ट निर्धारित केले. मात्र ही खरेदी गतीने न करता अनेक अडचणी ठेवत मंद ठेवली. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विक्री शिवाय पर्याय उरला नाही. हमीदर ४८९२ रुपये प्रति क्विंटल असताना खुल्या बाजारात चार हजारांवर भाव नसल्याने शेतकऱ्यांची शासकीय खरेदी व खुला बाजार, अशा दोन्ही ठिकाणी कोंडी झाल्याचे वास्तव समोर आले आहे. मुदतवाढीनंतर ८३७ शेतकऱ्यांची नोंदणी हे शासकीय व राजकीय अनास्था स्पष्ट करणारे ठरले आहे.

# "मरणारा शेतकरी हिंदू नाही का?", बच्चू कडू शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक

## अमरावतीत विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक दि. ७ अमरावती :**

पश्चिम विदर्भात वर्षभरात १ हजार १५१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या असताना या प्रश्नावर सरकारची संवेदनशीलता दिसत नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदू शेतकऱ्यांची संख्याच जास्त आहे. राज्यात आणि केंद्रात हिंदुत्ववादी सरकार आहे. मग तरीही हिंदू शेतकऱ्यांवर स्वत:ला संपवण्याची वेळ का येते? असा संतप्त सवाल बच्चू कडूंनी सरकारला विचारला आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्या नेतृत्वात येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर शेतकरी आणि मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी 'वाडा आंदोलन' सुरू करण्यात आले आहे. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

बच्चू कडू म्हणाले, सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये हिंदूंचीच संख्या जास्त आहे. तरीही केंद्रातील आणि राज्यातील हिंदूत्ववादी सरकारला शेतकऱ्यांचा कळवळा का नाही, हा प्रश्न आहे. आम्ही शेतकरी, शेतमजूर, मेंढपाळांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरलो आहोत. आंदोलनाची ही आमची पहिलीच वेळ नाही. आमचा जन्मच आंदोलनासाठी झाला आहे. पदावर असो किंवा नसो, आम्ही आमची सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्षाची भूमिका सोडणार नाही. सरकारने आमच्या मागण्यांची दखल घ्यावी, पोलिसांनी आंदोलकांची अडवणूक करू नये, अशी आमची अपेक्षा असल्याचे बच्चू कडू म्हणाले.

राज्यातील मेंढपाळ आपल्या न्याय मागणीकरिता सरकारचे उंबरठे झिजवित असताना त्यांच्या मागण्यांच्या संबधात मुख्यमंत्री कुठलेही ठोस पाऊल उचलत नाहीत. शेतकरी व मेंढपाळांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. सोयाबीन, तूर, कापसाचे भाव कोसळले आहेत. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशी परिस्थिती असताना शेतकऱ्यांनी आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी यावेळी सरकारला विचारला आहे.

संत गाडगेबाबा मैदानावरून मोर्चाला सुरूवात झाली. मेंढपाळाच्या वेशात घोड्यांवर स्वार होऊन बच्चू कडू आणि महादेव जानकर हे विभागीय आयुक्त कार्यालयावर पोहचले. मोर्चादरम्यान कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चात शेळ्या, मेंढ्या आणि घोड्यांसह शेकडो आंदोलक सहभागी झाले होते. राज्य सरकारने विधानसभा निवडणूकीच्या काळात घोषीत केलेली सरसकट कर्जमाफी शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, चराईकरिता परराज्यातून येणाऱ्या मेंढपाळांवर बंदी घालण्यात यावी अश्या अनेक मागण्या यावेळी 'वाडा आंदोलना'तून करण्यात आल्या आहेत.

# सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या प्रतिमा पूजनावरून वाद

## राज्य शासनाच्या 'या' निर्णयाला विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नागपूर**

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने नुकतेच राष्ट्रपुरुष व थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबतचे परिपत्रक जाहीर केले. यात भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन जयंती २५ ऑगस्टला साजरी करण्याच्या सूचना दिल्या. यावर अखिल भारतीय महानुभाव महामंडळाने आक्षेप घेतला आहे. श्रीचक्रधर स्वामी हे परमेश्वर अवतार आहेत. राष्ट्रपुरुष किंवा थोर व्यक्ती नाहीत. त्यांना जीव श्रेणीत आणून महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महानुभाव धर्माचा अपमान केला आहे. त्यामुळे या यादीतून त्यांचे नाव तात्काळ काढून टाकावे, अशी मागणी महामंडळाने केली आहे.



सामान्य प्रशासन विभागाने २७ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींची जयंती शासकीय व निमशासकीय विभागात साजरी करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यात मृत राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींप्रमाणेच २५ ऑगस्ट २०२५ ला सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन त्यांची जयंती त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजरी करावी, असा आदेश आहे. अखिल भारतीय महानुभाव महामंडळाच्या प्रसिद्ध पत्रकानुसार, हा आदेश महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानाला छेद देणारा आहे. महानुभावपंथीय श्रीचक्रधर स्वामींना परब्रह्म परमेश्वर मानतात. त्यांचे जीवोद्धरणाचे कार्य अविरत सुरू असून त्यांचा अवतार चिरायू आहे. राज्य शासनाने जयंती सदरामध्ये सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे नाव घेऊन त्यांचा मृत्यू सूचित केला, असाही आक्षेप घेण्यात आला असून शासनाने या यादीत २८ क्रमांकावर देण्यात आलेले सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे नाव तातडीने काढून टाकावे, अशी मागणी महामंडळाने केली आहे.

**प्रतिमा पूजन निषिद्ध**

महानुभाव तत्त्वज्ञान दैववादावर आधरित असल्याने जीव व परमेश्वर हे भिन्न मानण्यात येतात. त्यामुळे जिवांच्या जयंतीसोबत परमेश्वर अवतार असलेल्या श्रीचक्रधर भगवंतांच्या नावाचा अंतर्भाव करणे चुकीचे आहे. या तत्त्वज्ञानानुसार स्थान, प्रसाद, भिक्षुक, वासनिक या चार साधनांनाच वंदन, पूजन करणे ही महानुभाव पंथातील पूजाविधी आहे. कुठल्याही काल्पनिक प्रतिमा पूजनाला निषिद्ध मानले आहे. शासनाच्या परिपत्रकामध्ये सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याबाबतचा आदेश आहे. त्यामुळे या परिपत्रकातील सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे नाव तातडीने काढावे, अशी मागणी अखिल भारतीय महानुभाव महामंडळाच्या अध्यक्ष ॲड. तृप्ती बोरकुटे यांनी केली आहे.

# स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा

## वर्ध्याच्या आयपर महाविद्यालयास सांघिक विजेतेपद

### पूर्वा केवटी, श्रेया सिंग ठाकूर, रितेश तिवारी वैयक्तिक पुरस्काराचे मानकरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती**

शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना ह्या लोकहिताच्या आहे मात्र राजकीय स्वार्थापोटी दिल्या जाणाऱ्या लाभाच्या योजना ह्या लोकशाहीत घातक आहे या मताशी मी ठाम आहे असे प्रतिपादन खासदार बळवंत वानखडे यांनी केले. स्व. माणिकराव घवळे राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते.राजकीय स्वार्थासाठी दिल्या जाणाऱ्या योजना लोकशाहीस घातक आहेत या ज्वलंत विषयावर रंगलेल्या स्व.माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत यावर्षी वर्धा येथील औषध निर्माण शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था (आयपर) या संघाने सांघिक विजेतेपद पटकावले. स्पर्धकांच्या उस्फुर्त प्रतिसादात पार पडलेल्या या स्पर्धेचा प्रेक्षकांनी वैचारिक लाभ घेतला. बक्षीस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी विचार पिठावर स्पर्धेचे अध्यक्ष अतुल गायगोले, डॉ.अविनाश चौधरी,प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांची उपस्थिती होती.स्पर्धेचे परीक्षण पुणे येथील आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्रा.डॉ. पांडुरंग कंद,नागपूर येथील लोकसत्ता चे पत्रकार देवेश गोंडाणे,ब्रजलाल बियाणी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. मृणाल महाजन आणि साहित्यिक अमोल सावरकर यांनी केले.या स्पर्धेमध्ये वर्धा येथील आयपर महाविद्यालयाच्या श्रेया ठाकरे व राधा भावरकर या दोघींच्या संघाने यावर्षीचा सांघिक पुरस्कार पटकाविला.त्यांना फिरता चषक, रोख ११ हजार रुपयांचे पारितोषिक, व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.तर वैयक्तिक गटात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या पूर्वा केवटी,हिला रोख रक्कम ७००० प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.द्वितीय पुरस्कार सिपना इंजिनिअरिंग कॉलेज येथील श्रेया सिंग ठाकूर हिला रोख रक्कम ५००० प्रमाणपत्र स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. नागपूर येथील इग्नू विद्यापीठाचा रितेश तिवारी याला रोख रक्कम ३००० प्रमाणपत्र व चिन्हासह तृतीय पुरस्काराने सन्मानित करण्यातआले. शिवाजी शिक्षण महाविद्यालयाच्या वैष्णवी सानप या विद्यार्थिनीने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले तिला रोख रक्कम २००० प्रमाणपत्र देऊन मान्यवरांनी सन्मानित केले. बुलढाणा येथील माजी न्यायाधीश स्व.रमेश दिनोदे स्मरणार्थ विशेष उत्तेजनार्थ पुरस्कार गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचा तुषार बुधबावरे याला देण्यात आले.




बक्षीस वितरण समारंभाचे प्रास्ताविक संयोजक प्रफुल्ल घवळे,संचालन मयूर चौधरी व आभार प्रदर्शन वैशाली गरकल यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा.डॉ.अमित गावंडे,प्रा.डॉ.शितलबाबू तायडे, संदीप मुर्ताडकर,गौरव इंगळे,प्रा. रत्नाकर शिरसाट, रवींद्र घवळे, तसेच डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालय येथील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय आणि स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत सत्तरून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला.राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या स्पर्धकांनी आपली अभ्यासपूर्ण मते व विचार मांडून सभागृह दणाणून सोडले.

# महापालिका निवडणुका कधी होणार? सुप्रीम कोर्टात जनहित याचिका दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७पुणे**

देशामध्ये लोकसभा निवडणुका पार पडल्या. त्यापाठोपाठ महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका देखील झाल्या. तरी अद्याप स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली नाही. सर्वच राजकीय पक्ष या निवडणुकांची वाट पाहत आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या ३ ते ४ वर्षांपासून प्रशासकांच्या हाती आहेत. या निवडणुकांबाबत आता सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, महापालिकेच्या निवडणुकीसाठी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. राज्यातील २९ महापालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदा आणि २८९ पंचायत समित्यांची मुदत संपल्याने तेथे प्रशासक नियुक्त करण्यात आले आहेत. लोकप्रतिनिधी नसल्याने प्रभागातील छोट्या-छोट्या समस्याही सुटणे अवघड झाले आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे. अशामध्ये या निवडणुका कधी होणार असा सवाल वारंवार विचारला जात आहे.

कोरोनाच्या साथीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या, यानंतर प्रभाग रचना आणि ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यावरूनही याचिका दाखल झाल्याने निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर एप्रिल- मे महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पण त्याबाबत अधिकृत अशी काहीच माहिती नाही. या अनिश्चिततेच्या काळात निवडणुका कधी होणार याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

या निवडणुकांसाठी पुण्यातील एका व्यक्तीने सर्वोच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्ते यांनी पुणे, पिंपरी, अमरावती नागपूर यासह अन्य महापालिकांमध्ये नागरी समस्यांबाबत आमच्या संस्थेकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या असल्याचे याचिकेमध्ये म्हटले आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने, प्रशासकीय कर्मचारी लोकांच्या हिताकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे आम्ही निवडणूक घेण्याची मागणी केली आहे, असे याचिकाकर्त्याने सांगितले.

# आज सायंकाळी अवकाशात दिसणार नवग्रहांचा नजराणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

मंगळवारपासून शाकंभरी नवरात्र प्रारंभ होत असून, दुर्गाष्टमीसुद्धा आहे. हा अत्यंत शुभ दिवस असून, या दिवशी योगायोगाने नागपूरच्या अवकाशात आपल्याला डोळ्यांनी नवग्रहांपैकी काही महत्त्वाच्या ग्रहांचे दर्शन प्रत्यक्ष घेता येणार आहे, अशी माहिती आंतरराष्ट्रीय ज्योतिषाचार्य डॉ. अनिल नागेश वैद्य यांनी दिली आहे.



डॉ. वैद्य यांच्या मते, मंगळवारी दुपारी ४.२८ वाजता अष्टमी संपून, शुक्ल पक्षाच्या नवमीचा प्रारंभ होणार आहे. या दिवशी अमरावतीकरांना अनोखी खगोलीय घटना पाहायला मिळणार आहे. सायंकाळी सात वाजता अवकाशात सात ग्रहांचे दुर्मीळ दर्शन एकावेळेस होऊ शकेल. याशिवाय पश्चिमेच्या बाजूला अवकाशात शुक्राची चमकदार चांदणी पाहायला मिळेल. तसेच चांदणीच्या थोडे वर शनि महाराज त्यावर जवळच नेपच्यून ग्रह स्पष्टपणे दिसणार आहे. आकाशात मध्यभागी अष्टमीचा अर्धचंद्र मीन राशीतला तसेच पश्चिमेला कुंभ व मकर राशी मावळतीला राहील.तर पूर्व बाजूला सध्या वक्री असलेला युरेनस मेष राशीतला दिसून येईल. त्यामुळे पूर्व दिशेला पाहिल्यास लाल रंगाचा मंगळ कर्क राशीत आपल्याला सहज दर्शन देणार आहे. नेहमी दिसणाऱ्या ध्रुवताऱ्याच्या आजूबाजूला ताऱ्यांचा प्रश्नचिन्हसारखा दिसणारा समूह हा सप्तऋषी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अमरावतीत आशियातील सर्वात मोठी फ्लाइंग अकादमी

## नागपूर विमानतळाचे काम वेगाने पूर्ण करा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह नागपूर, शिर्डी विमानतळाचे काम गतीने करून दिलेल्या मुदतीत पूर्ण करावेत अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. अमरावतीत एअर इंडियाची फ्लाइंग ॲकॅडमी सुरू होणार असून ही आशियातील सर्वात मोठी अकादमी असणार आहे.

राज्यातील सर्व विमानतळाच्या बांधकाम प्रगतीच्या कामासंदर्भात आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची प्रमुख उपस्थिती होती. फडणवीस म्हणाले, सोलापूर आणि कोल्हापूर येथे नाईट लँडिंग होईल, असे नियोजन करा. शिर्डी येथे नाईट लँडिंगची सुविधा लगेच सुरू करा. नागपूर आणि शिर्डी विमानतळाचे अडलेले प्रश्न ३१ मार्चपर्यंत सोडवा. जळगाव येथे नवीन टर्मिनल इमारत तयार करा. पुरंदर विमानतळ जागा अधिग्रहण प्रक्रिया लवकर सुरू करा. पालघर विमानतळ उभारणीसाठी प्रक्रिया सुरू करा अशा सूचना त्यांनी दिल्या. त्यांनी राज्यातील ११ विमानतळांचा आढावा घेतला.



ज्या विमानतळावर रात्री विमान उतरण्याची सुविधा आहे. तेथेही काही अडचणी येत असल्याचे समजले आहे. काही विमानतळाचे काम अनेक दिवसांपासून सुरू आहे. उशीर का होत याचे कारणे शोधून लवकरात लवकर मार्ग काढून कामे पूर्ण करावे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यावेळी नवी मुंबई, नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळांचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यामध्ये झालेले काम, उर्वरित कामासाठी लागणारा कालावधी, प्रलंबित परवानग्या, आर्थिक बाजू, जमीन संपादन अशा विविध भागांचा आढावा घेतला.

# एसआरपीएफ कॅम्पजवळ ब्रेक फेल झालेला ट्रक पलटी; ड्रायव्हर गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती**

चांदूर रेल्वेहून अमरावतीकडे तेल घेऊन येणाऱ्या ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने एसआरपीएफ कॅम्पजवळ आज, ७ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास मोठा अपघात झाला. ट्रक क्रमांक १२ ७००३ असलेल्या या वाहनाने नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या खाली जाऊन पलटी घेतली. अपघातामुळे हजरो लिटर तेल वाहून गेले आहे.घटनेची माहिती मिळताच अमरावती महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान, स्थानिक पोलीस आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाचे पथक घटनास्थळी त्वरित दाखल झाले.



अथक परिश्रमानंतर त्यांनी ट्रकच्या कॅबिनमध्ये अडकलेल्या ड्रायव्हरला बाहेर काढले.अपघातात ड्रायव्हर गंभीर जखमी झाला असून त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. त्याला तात्काळ उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.ब्रेक फेल झाल्यामुळे ट्रक रस्त्यावरून घसरला. मात्र, ड्रायव्हरने प्रसंगावधान राखत ट्रक रस्त्याच्या खाली उतरवला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला, अन्यथा या अपघातामुळे मोठे जीवितहानी होण्याची शक्यता होती.अपघातामध्ये ट्रक पलटी झाल्यामुळे हजरो लिटर तेल वाहून गेले आहे. या घटनेचा अधिक तपास स्थानिक पोलीस करत आहेत.